# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २७, १९३९ ( शके )**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६६**

---

### हाफकिन महामंडळात पोलिओबल्क खरेदीच्या निविदाप्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(१) * १०३२३८ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाफकिन महामंडळात पोलिओबल्क खरेदीच्या निविदाप्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी केंद्रीय दक्षता आयोगाच्या सूचनांचे पालन झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने गैरव्यवहार झाला असल्याचे नमूद करून संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये प्रस्तुत प्रकरणी केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन झाले नसल्याचे नमूद केले आहे. तथापि, सदर न्यायनिर्णयामध्ये संबंधीतांवर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश देण्यात आलेले नाहीत.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणीची चौकशी करण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## वाई (जि.सातारा) येथे अवैध विक्रीकरीता पाठविण्यात येत असलेले धान्य जप्त केल्याबाबत

**(२) * ९५८९१ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाई (जि.सातारा) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या लगत असलेल्या खाजगी जागेतील पत्र्याच्या शेडमधून स्वस्त धान्य दुकानदारांना विकला जाणारा ९२०० किलो शासकीय गहू व १५०० किलो तांदूळ छापील पोती बदलून प्लास्टीक पोत्यात धान्य भरुन अवैध विक्रीकरीता पाठविताना पोलिस विभागाने पकडला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाई येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या लगत असलेल्या खाजगी जागेतील पत्र्याच्या शेडमध्ये महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर कारवाई केली असून यानिमित्ताने जिल्हा पुरवठा विभागाची अकार्यक्षमता निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त धान्य गैरव्यवहाराप्रकरणी जिल्हा पुरवठा शाखेची एसआयटी मार्फत तसेच जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या गैरवर्तणुकीची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी जिल्ह्यातून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाई येथील धान्य गैरव्यवहारासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

वाई येथील एमआयडीसी लगत खाजगी जागेतील पत्र्याच्या शेडमधुन ९,३०० किलो गहु व २१५० किलो तांदुळ असा मुद्देमाल पोलिस विभाग व पुरवठा विभागातील कर्मचारी यांनी संयुक्तपणे पकडलेला आहे.
(२) सदर प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा तहसिलदार, वाई व पोलीस यांनी संयुक्तरित्या पकडलेला आहे. तहसिलदार हे तालुक्याचे पुरवठा विभागाचे प्रमुख म्हणून काम करतात. त्यामुळे पुरवठा विभागाकडून कार्यवाही झालेली नाही, असे म्हणणे संयुक्तिक नाही.
(३) या प्रकरणाच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त नाही.
(४) या प्रकरणी श्री.प्रशांत शंकर पलंगे यांच्या खाजगी गोदामामध्ये सदरचे धान्य आढळून आल्याने त्यांच्या विरुध्द जिवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ च्या कलम ३ व ७ अंतर्गत वाई पोलिस स्टेशन येथे गु.र.नं. ०२७० दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच जिवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ च्या कलम ६-अ अन्वये जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर-बोदवड-वरणगांव (जि.जळगांव) या परिसरातील ८१ गावांची पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत

**(३) * १०२९७९ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर-बोदवड-वरणगाव (जि.जळगांव) या परिसरातील ८१ गावांची पाणी पुरवठा योजना कार्यक्षमतेने कार्यान्वीत करण्यासाठी महाराष्ट्र जीवन

प्राधिकरणाकडून मागविण्यात आलेल्या निविदांचा प्रस्ताव सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदांची प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन कामास सुरुवात करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यातील ५१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या निविदा प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या दि.०५.१२.२०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

भुसावळ तालुक्यातील ३१ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदेकरिता प्रथम न्युनतम देकार सादर केलेल्या ठेकेदाराने अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम न भरल्यामुळे तो अपात्र ठरला. त्यामुळे द्वितीय न्युनतम देकार सादर केलेल्या ठेकेदारास प्रथम न्युनतम देकाराइतका देकार कमी करण्यास तयार असलेबाबत विचारणा करुन ठेकेदाराकडून याबाबत माहिती प्राप्त झाल्यानंतर, सदर कामाची निविदा मजीप्राच्या निविदा समितीच्या पुढील बैठकीत ठेवण्याचा निर्णय दि.०५.१२.२०१७ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदरूख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्पात अनियमितता करणाऱ्या तांत्रिक सेवा पुरवठादारावर कारवाई करण्याबाबत

**(४) * १००७०९ श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदरूख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्पाच्या स्थानिक निधी लेखा परीक्षण विभाग, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या विशेष लेखा परीक्षणाच्या अहवालात सदर प्रकल्पाच्या कामात खरेदी/निविदा प्रक्रियेत व मोजमाप नोंदवहीत अनियमितता, शासन निर्णयाप्रमाणे देयके अदा न करणे अशा गंभीर

अनियमितता निदर्शनास आल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सिंधुदुर्ग यांनी तांत्रिक सेवा पुरवठादार श्री. प्रदीप सीताराम सामंत यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतचे पत्र पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांना दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले असतानाही आजतागायत संबधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक निधी लेखा परीक्षण अहवालात तांत्रिक सेवा पुरवठादार यांनी केलेली अनियमितता स्पष्टपणे नमूद असतानाही मालवण पोलीस ठाण्यातील तपास अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत सदरहु लेखा अहवालाकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करून तांत्रिक सेवा पुरवठादाराविरुद्ध पुरावा नसल्याची सबब देवून अद्यापपर्यंत फौजदारी गुन्हा दाखल केला नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर प्रकल्पातील दोषी तांत्रिक सेवा पुरवठादाराविरुद्ध तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई करणाऱ्या मालवण पोलीस ठाण्यातील संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांच्या दि. ३१ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये तांत्रिक सेवा पुरवठादाराविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांना कळविण्यात आले. तथापि, सदर प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये तांत्रिक सेवा पुरवठादार श्री. प्रदिप सिताराम सावंत यांचेवर कारवाई करणे इतपत पुरावा उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे त्यांचेविरूद्ध गुन्हा दाखल केला नाही, असे पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी दि. १९ सप्टेंबर,२०१७ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांना कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा (जि.सातारा) येथील झेनिथ केमिकल ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज या बनावट औषधे उत्पादन करणाऱ्या कारखान्यावर कारवाई करण्याबाबत

**(५) * ९५२३७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा (जि.सातारा) येथील झेनिथ केमिकल ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज बनावट औषधे उत्पादन करणारा कारखाना तातडीने बंद करण्याचे आदेश अन्न व औषध प्रशासन विभागाने दिल्याची बाब दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर कंपनीमध्ये मान्यताप्राप्त तज्ज्ञ नसणे, गुणवत्ता तपासणी व कोणतीही चाचणी न करता उत्पादन केलेल्या औषधांची बाजारात विक्री करणे अशा अनेक बाबी "एफडीए" च्या अहवालात निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीची सहआयुक्त, सातारा यांनी तपासणी करुन त्याचा अहवाल सहआयुक्त, पुणे यांना सादर केल्यावर उक्त तपासणी अहवालानंतर मंत्री महोदयांकडून आदेश येईपर्यंत संबंधीत कंपनी विरोधात कारवाई करण्यास दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत हेतुपुरस्सर दिरंगाई केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कंपनीवर कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या सबंधितांवर व उक्त कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात भेसळयुक्त अन्नसाठा आढळून आल्याबाबत

**(६) * ९५९९० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड)** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात भेसळयुक्त मिठाई, खाद्यतेल, खवा, फरसाण, बेसन, वनस्पती तूप आणि घी इत्यादी २२ लाख ८५ हजार रुपये किंमतीचा अन्नसाठा माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार भेसळयुक्त अन्नपदार्थ उत्पादकांवर व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) या कालावधीत मिठाई, खाद्यतेल, मावा, फरसाण यांचे २७ नमूने विशेष मोहिम राबवून विश्लेषणाकरीता घेऊन कमी दर्जाचे असल्याच्या संशयावरुन साठा जप्त करण्यात आला होता. विश्लेषणास घेतलेल्या २७ नमून्यांपैकी ०४ कमी दर्जाचे, ०३ गैर छाप्याचे, ०८ नमूने प्रमाणित दर्जाचे आढळले आहेत. १२ नमून्यांचा अहवाल प्रलंबित आहे. कमी दर्जाच्या व गैर छाप्याचे नमुन्यांच्या अहवालावर अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ अंतर्गत न्यायनिर्णय खटले दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे. उर्वरीत १२ प्रकरणी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(७) * ९६८४१ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान**

**(चांदिवली), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २०१२ मध्ये गुटखा उत्पादन आणि विक्रीवर बंदी घातल्यानंतरही मुंबईसह राज्यात गुटखा सहजरित्या उपलब्ध होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील व पनवेल तालुक्यातील शाळा,महाविद्यालय तसेच शैक्षणिक परिसरामध्ये तंबाखूजन्य गुटखा व सिगारेट पदार्थांच्या विक्रीस बंदी असताना संस्थेचा परिसर व सभोवताली, मेहकर (जि.बुलढाणा) शहरासह जानेफळ, डोणगांव, सुलतानपूर आदि ठिकाणी तसेच ठिकठिकाणी पानटपऱ्या व स्टॉलवर दुकानदार मोठया प्रमाणावर गुटखा तसेच तंबाखूजन्य पदार्थांची सर्रासपणे विक्री करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अर्धापूर (जि.नांदेड) शहरात तयार करण्यात येत असलेल्या बनावट गुटख्याची राजरोसपणे विक्री होत असून हिंगोली जिल्ह्यात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे १० लाख रुपये किंमतीचा बेकायदेशीररितीने परराज्यातून विक्रीस येणारा गुटखा जप्त करण्यात आला असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सांताक्रुझ (मुंबई) येथे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी आर्थिक गुन्हे शाखेच्या सीबी कंट्रोल विभागाने एक कोटी रूपयांचा गुटखा जप्त केला, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी डोंगरीच्या सोलापूर स्ट्रीट परिसरातील एका गोदामावर धाड टाकून रूपये १५ लाख किंमतीचे १३० गुटख्याचे बॉक्स जप्त केले व

गुजरातहून आलेल्या एका टेम्पोचा पाठलाग करून घाटकोपर येथील असल्फा व्हिलेज भागात पोलीसांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी रूपये १५ लाखांचा गुटखा पकडला असून त्याच दरम्यान लातूर जिल्हयात देखील कर्नाटकातून आलेला ट्रक पकडला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार राज्यात गुटखा विक्रीस बंदी करण्याबाबत व याप्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

छुप्या मार्गाने विक्रीस उपलब्ध होत असलेल्या गुटख्यावर अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाई केली जाते.

(२) हे खरे नाही.

(३) अर्धापूर (जि.नांदेड) शहरात बनावट गुटखा तयार करण्यात येत असून त्याची राजरोसपणे विक्री तसेच हिंगोली जिल्हयात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले हे खरे नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे १० लाख रुपये किंमतीचा बेकायदेशीररित्या परराज्यातून विक्रीस येणारा गुटखा पोलीसांकडून जप्त करण्यात आलेला आहे. पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाकडून याबाबत पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(४) सी.बी. कंट्रोल, आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई या कक्षाने प्रश्नामध्ये नमूद दिनांकास नमूद केल्याप्रमाणे कारवाई केली असून त्यामध्ये खाली नमूद प्रमाणे रकमेच्या गुटख्यासंबंधी कारवाई केलेली आहे.

- दि.०३.१०.२०१७ रोजी रु. २८,८७,१५०/-
- दि.०४.१०.२०१७ रोजी रु. १२,६५,०००/-
- दि.१०.१०.२०१७ रोजी रु. ९,३१,४६०/-

त्याच बरोबर अन्न व औषध प्रशासनाच्या लातूर कार्यालयाने दि.२७.१०.२०१७ रोजी एमएच ४३ वाय ५१६१ या वाहनातून ४२,१२,०००/- किंमतीचा प्रतिबंधीत अन्न साठा जप्त केला आहे.

(५) अन्न व औषध प्रशासन तसेच पोलीसांकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या माहिती नुसार कारवाई केली जाते. यापुढे देखील याप्रमाणेच कारवाई करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गुंदवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील न्यूवेरा वेलनेस व्हेंचर कंपनीच्या गोदामातून उत्तेजक द्रव्ययुक्त चिक्की व अन्य साहित्य जप्त केल्याबाबत

**(८) * ९७९७९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.गुंदवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील न्यूवेरा वेलनेस व्हेंचर प्रा.लि.या कंपनीच्या गोदामातून अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ३० जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास छापा टाकून उत्तेजक द्रव्ययुक्त चिक्की व कच्चा माल, पॅकिंग साहित्य तसेच अन्य मशिनरी जप्त केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनी अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियमांचे उल्लंघन करून उत्तेजक द्रव्ययुक्त चिक्कीचे उत्पादन व विक्री करीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सहा महिन्यांपूर्वी या कंपनीच्या कार्यालयावर अन्न व औषध प्रशासनाच्यावतीने कारवाई करुनही संबंधीत कंपनीने प्रतिसाद न दिल्याने उक्त छापा टाकण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीच्या मुंबईतील कार्यालयावर ज्या दिवशी कारवाई करण्यात आली त्याच दिवशी भिवंडी येथील गोदामावर छापा टाकून मशिनरी, कच्चा माल व इतर साहित्य जप्त करणे आवश्यक असतांना असे करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कंपनीवर तसेच संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) सदरची घटना दिनांक २९/०७/२०१७ रोजीची आहे. मेसर्स न्यूवेरा वेलनेस व्हेंचर प्रा.लि, मु.पो.गुंदवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) या कंपनीवर प्रशासनाने छापा टाकून संशयित चिक्की-स्वीट मीट (न्युट्रिशन बार), चोकोफज व चोकोस्लीम या अन्न पदार्थाचा नमुना घेऊन साठा जप्त करण्यात आलेला आहे. सदर पेढी ही उत्पादक पेढी नसल्याने कच्चा माल, पॅकिंग साहित्य व अन्य मशिनरी जप्त करण्याचा प्रश्न येत नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) वडाळा, मुंबई येथील मेसर्स न्यूवेरा वेलनेस व्हेंचर्स प्रा.लि. कंपनीवर दिनांक १५/११/२०१६ रोजी छापा टाकण्यात आला व त्याअनुषंगाने विश्लेषणासाठी घेतलेल्या अन्न पदार्थात कोणत्याही प्रकारचे उत्तेजक द्रव्य आढळून आलेले नाही. तथापि, सदर प्रकरणातील अन्न पदार्थ लेबलदोषयुक्त आढळून आल्याने कंपनीवर पुढील कारवाई करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी शासनाने अद्याप चौकशी केली नसून संबंधीतांकडून दिरंगाई किंवा कर्तव्य कसूरता आढळल्यास पुढील उचित कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत झालेली वाढ

**(९) * ९५२३० श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर**

**(चंदगड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इंधनाचे दर सातत्याने वाढत असल्यामुळे डाळींसह कांदे, तेल व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या दरात गत दोन महिन्यांपासून मोठी वाढ होऊन राज्यातील जनता महागाईमुळे त्रस्त झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध भागात वाढत्या महागाई विरोधात आंदोलने-निदर्शने होत असून ठाणे शहरात दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास महागाईविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर व महागाईवर नियंत्रण आणण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) राज्यातील ४ केंद्रांच्या एकत्रित सरासरी दरानुसार माहे सप्टेंबर, २०१७ च्या तुलनेत ऑक्टोबर, २०१७ मध्ये चणाडाळ ४.३४%, तुरडाळ १.७५%, उडीदडाळ ३.०९%, मुगडाळ १.४०%, मसूरडाळ २.८१%, सोयातेल ०.३६% सनफ्लावर तेल १.१५%, या जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत सरासरी घट झालेली आहे. तर पामतेल ०.०२% शेंगदाणा तेल १.२६% व कांदा २५.६०% या वस्तुंच्या किंमतीत वाढ झालेली आहे.

तसेच ऑक्टोबर, २०१७ या महिन्याच्या तुलनेत नोव्हेंबर, २०१७ या महिन्यात चणाडाळ ६.१४%, तुरडाळ ३.३४%, उडीदडाळ २.८५%, मुगडाळ १.६३% या जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत सरासरी घट झालेली आहे. तर मसूरडाळ ०.०९% पामतेल १.४०%, शेंगदाणा तेल ०.४१%, सोयातेल ०.२७%, सनफ्लावर तेल ०.४७%, व कांदा ३५.१६% या जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत सरासरी वाढ झालेली आहे.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे महागाई संदर्भात निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील २२ जिल्ह्यामधील ४९ हजार रेशन दुकाने बंद ठेवल्याने स्वस्त धान्य दुकानांच्या अन्नधान्य वितरणावर झालेला परिणाम

**(१०) * ९५३१३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २२ जिल्ह्यामधील ४९ हजार रेशन दुकाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये बंद ठेवल्याने रास्त धान्य दुकानातून अन्नधान्य वितरणावर विपरित परिणाम होऊन लाखो कुटूंबांपर्यंत अन्नधान्य पोहोचू शकले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील २२ जिल्ह्यातील ४९ हजार रेशन दुकाने दिनांक १ ऑगस्ट, २०१७ पासून बंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बुलढाणा जिल्हयातील सर्व महसूल विभागातील अन्न पुरवठा कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा संप असल्यामुळे मंगळवेढा व माढा (जि.सोलापूर) येथील लाभार्थ्यांना ऐन दिवाळीत रेशन दुकानातून धान्य मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील जनतेला सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मिळणारे धान्य व इतर वस्तू उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) महसूल कर्मचाऱ्यांचा दि.१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. १३ ऑक्टोबर, २०१७ या संपाच्या कालावधीत बुलडाणा जिल्हयात महसूल आस्थापनेतील पुरवठा शाखेमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी संपावर गेले होते. तथापि, मूळ पुरवठा आस्थापनेतील कार्यरत कर्मचारी हे कार्यालयात हजर असल्यामुळे स्वस्त धान्य दुकानांतून अन्नधान्य वितरणावर कोणताही विपरीत परिणाम झाल्याची बाब आढळून आलेली नाही. तथापि, मंगळवेढा व माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुकानांतर्गत लाभार्थ्यांना पुरवठा करण्यात विलंब झालेला असून सदर धान्य लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये प्राधान्याने वितरित करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रात्र शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना प्रलंबित वेतनासह सेवानिवृत्तीचा लाभ मिळणेबाबत

**(११) * ९८१०३ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्र शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना गत ४ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याची बाब दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शासन निर्णय दिनांक १७ मे, २०१७ नुसार रात्रशाळा व रात्र ज्युनिअर कॉलेजमधील १०१० शिक्षक, ३४८ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रात्र शाळेत दिवसा अतिरिक्त असलेल्या शिक्षकांचे समायोजन केले गेले असल्याने दिवसा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये एकही शिक्षक अतिरिक्त नसल्यामुळे रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील काम करणाऱ्या शिक्षकांना सेवेतून कमी न करता त्यांना शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या दिनांक २१ जुलै, २०१७ रोजीच्या पत्रानुसार रात्र कनिष्ठ महाविद्यालयांच्या सेवेत ठेवले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, दिनांक २८ व २९ ऑगस्ट, २०१७ रोजी शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या पत्रानुसार रात्र कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षकांचे वेतन तात्काळ अदा करण्याच्या सूचना दिल्या असताना शिक्षण उपसंचालक कार्यालय व वेतन अधिक्षक यांच्यात समन्वय नसल्याने रात्र कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांचे वेतन थांबविल्यामुळे या शिक्षकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बहुतांश शिक्षक हे सकाळच्या सत्रामध्ये अनुदानित, विनाअनुदानित शाळांवर पूर्णवेळ शिक्षक असून ते शासनाच्या सर्व पेन्शन, सेवानिवृत्ती, ग्रॅज्युईटी आदींचा लाभ घेतात, मात्र याच शाळांवर मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले अर्धवेळ शिक्षक तसेच रात्रशाळांमधून निवृत्त झालेल्या सेवानिवृत्त शिक्षकांना कोणताही लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तयात काय आढळून आले व त्यानुसार उक्त शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या व निवृती लाभ तसेच वेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षक अतिरिक्त नसल्याने समायोजनाअभावी रात्रशाळेतील उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय यामधील विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर विपरित परिणाम होऊ नये याकरिता रात्रीच्या उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय यामध्ये दुबार सेवा करणाऱ्या शिक्षकांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात, सदर पदावर नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत चालू ठेवण्यात आलेल्या आहेत.

शालार्थ वेतन प्रणालीमधून यापूर्वी वगळण्यात आलेल्या दुबार सेवा करणाऱ्या शिक्षकांच्या नावाचा अंतर्भाव सदर वेतन प्रणालीमध्ये करण्याच्या सूचना संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यास देण्यात आलेल्या आहेत.
(५) व (६) महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली,१९८१ मधील नियम २१ टीप-४ नुसार रात्रशाळेतील कार्यभार हा पूर्णवेळ शिक्षकाच्या निम्मा असल्याने पूर्णकालिक शिक्षकांना अनुज्ञेय असलेले भविष्य निर्वाह निधी, निवृत्तीवेतनादी लाभ फक्त रात्रशाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना अनुज्ञेय होत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील शिर्डी मतदार संघ व राहता तालुक्यातील गावांचा मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये समावेश करण्याबाबत

**(१२) * ९५२३५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी मतदारसंघातील (जि.अहमदनगर) मौ.आश्वी खुर्द, प्रिंपी, लौकी मजमपूर, झरेकाठी, खळी, मोरवाडी, तरसवाडी, अस्तगांव दहेगांव कोऱ्हाळे तसेच राहाता तालुक्यातील केळवड बु. व कोऱ्हाळे या गावांचा केंद्रीय राष्ट्रीय पेयजल योजनांमध्ये शासनाने समावेश केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सन २०१५-१६ पासून राष्ट्रीय पेयजल योजना बंद केली असल्याने सदर गावांमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याकरिता या गावांच्या योजनांचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये करुन त्यानुसार योजना कार्यान्वित करावी अशी मागणी ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या गावातील योजनांचा प्राधान्याने मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करण्याबाबतची मागणी मा.विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ग्रामस्थांनी केलेली मागणी व सादर केलेल्या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शिर्डी मतदार संघातील मौ.आश्वी खु व पिंप्री लौकी आजमपूर या दोन गावांच्या पाणी पुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१४-१५ अंतर्गत मंजूर असून सद्यस्थितीत सदरच्या योजना भौतिकदृष्टया पूर्ण झाल्या असून योजनेतून पाणी पुरवठा सुरू केला आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम १ मध्ये केलवड बु. व कोऱ्हाळे ही दोन गावे समाविष्ट असून दोन्ही गावांच्या पाणी पुरवठा योजनेचे सादरीकरण दि.२४.४.२०१७ च्या तांत्रिक समितीसमोर झाले असून त्याबाबतचा पूर्तता अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. सदर योजनांना मान्यता देणेबाबत पुढील कार्यवाही चालू आहे.

झरेकाठी, खळी, मोरवाडी-तरकसवाडी (अस्तगांव) व दहेगांव कोऱ्हाळे या गावांचा समावेश मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा २ मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

तथापि, सन २०१७-१८ साठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या कृती आराखडयास मंजूरी मिळालेली असून त्यामध्ये झरेकाठी, खळी, मोरवाडी-तरकसवाडी (अस्तगांव) व दहेगांव कोऱ्हाळे या गावांचा समावेश आहे. सदर गावांच्या योजनांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत कार्यवाही चालू असून सदर कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बायोमॅट्रिक पध्दतीने पॉस मशीनद्वारे धान्य वाटपात ग्राहकांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१३) * ९५९२० श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वस्त धान्य दुकानांमध्ये डिजिटल पीओएस मशीन प्रणालीने धान्य वितरण करण्यास अनेक अडचणी येत आहेत अशी तक्रार ऑल महाराष्ट्र फेअर प्राईस शॉपकीपर्स फेडरेशनने केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच अहमदनगर जिल्ह्यामध्ये व मिरज (जि.सांगली) येथील ग्राहकांना बायोमॅट्रिक पध्दतीने पॉस मशीनद्वारे धान्य वाटप केले जात आहे परंतु काही ग्राहकांची रेंज नसल्याने मशीनमध्ये डाटा भरला जात नाही, लाभार्थ्यांचे अंगठे जुळत नाही, लाभार्थ्यांची पूर्ण माहिती नाही तर कधी सर्व्हर बंद होत असल्याने त्याचा त्रास दुकानादारांसोबतच ग्राहकांनाही होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नाशिक जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांची आधार जोडणी ठेकेदाराकडून करुन घेताना पुरवठा खात्याने दुकानदारांकडून तीन वेळा वर्गणी गोळा करुन इपॉस यंत्रात चुकीची माहिती जोडण्यात आल्याने जवळपास ३० ते ४० टक्के शिधापत्रिकाधारक अन्नधान्यापासून वंचित राहिल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित ठेकेदाराने केलेल्या चुकीमुळे नागरिकांना अन्नधान्यापासून वंचित रहावे लागल्याने चुकीच्या कामाबद्दल रेशनदुकानदारांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार डिजिटल पीओएस मशीन प्रणालीद्वारे ग्राहकांना सहज व सुलभ रितीने लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
(५) शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार लाभार्थ्यांची बायोमेट्रीक ओळख पटवून धान्य वाटप करण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांचे आधार अधिप्रमाणन होत नाही अथवा ज्या लाभार्थ्यांचा डाटाबेसमध्ये समावेश नाही असे पात्र लाभार्थी

अन्नधान्य मिळण्यापासून वंचित राहणार नाहीत याबाबत कार्यवाही करण्याच्या दि. १७.४.२०१७ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत व त्यानुसार अन्नधान्याचे वाटप सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी व डोंबिवली (जि.ठाणे) येथे विनापरवाना आयुर्वेदिक औषधांचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * १०१७८८ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी व डोंबिवली (जि.ठाणे) येथे विनापरवाना आयुर्वेदिक औषधांचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांवर अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईत रुपये २७ लाखांहून अधिक रुपयांचा औषधांचा साठा व मशिनरी जप्त केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विनापरवाना औषध उत्पादन व विक्री करणाऱ्या कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली तसेच उक्त प्रकार कायमस्वरूपी रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) मे. एम.एम. प्रोडक्ट्स डोंबिवली येथे विनापरवाना आयुर्वेदीक औषधे उत्पादन होत असल्याचे निदर्शनास आल्यावर दिनांक ०३.११.२०१७ रोजी प्रशासनाकडून धाड टाकण्यात आली. तेथील प्राप्त माहितीच्या अनुषंगाने दिनांक ०६.११.२०१७ रोजी मे. मनन डिस्ट्रीब्युटरर्स भिवंडी जि. ठाणे या वितरकावर धाड टाकण्यात आली. एकुण दोन्ही प्रकरणात रु. २७,७८,२११/- ऐवढा किंमतीचा आयुर्वेदीक औषधी साठा व मशिनरी जप्त करण्यात आली.

(२) उपरोक्त दोन्ही आस्थापनांमधून जप्त केलेल्या औषधीपैकी ८ नमुने चाचणी व विश्लेषनाकरीता पाठविण्यात आले असून त्याचा अहवाल प्रलंबित आहे. सदर मालाच्या जप्तीबाबत न्यायालयातून दिनांक ०७.११.२०१७ रोजी कस्टडी ऑर्डर घेण्यात आली आहे. दोन्ही प्रकरणांची प्रशासनाकडून चौकशी सुरु असून नमुनांचे चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधीतांविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल. प्रशासनातील अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रात गोपनिय माहीती घेवून वेळोवेळी कारवाई करतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमधून होणारे प्रदूषण

**(१५) * ९५१९६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील खोपोली औद्योगिक परिसरातून घातक रसायन भरुन तळोजा औद्योगिक परिसरातील नाल्यामध्ये बेकायदा पध्दतीने सोडणाऱ्या एका टँकरचालकाला ग्रामस्थांनी पकडले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी ग्रामस्थांनी तळोजा औद्योगिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंद केली मात्र पोलीसांनी गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तळोजा औदयोगिक वसाहतीतील डुकॉल ऑरगॅनिक्स ॲण्ड कलर्स प्रा.लि., कंपनी बंद करण्याचा आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिला आहे, हे ही खरे आहे काय.

(४) तसेच तळोजा परिसरातील रसायनयुक्त प्रदूषित पाणी कासार्डी नदी व अंतर्गत गटारामध्ये जात असल्याने नागरिकांच्या व मुक्या प्राण्यांच्या जिवीतास धोका निर्माण होऊन वेगवेगळया आजारांना सामोरे जावे लागत असून तळोजासह पनवेल, खारघर परिसरामध्येही प्रदूषण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांवर तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) कासार्डी नदीमध्ये सांडपाणी जाऊ नये यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळास सांडपाणी वाहून नेणा-या पाईपलाईन व चेंबरची दुरुस्ती करण्यासाठी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अलिबाग यांना दिनांक ८.९.२०१७ व दिनांक ३०.१०.२०१७ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल (प्र. व प्र.नि.) कायदा १९७४ च्या ३३ अन्वये प्रस्तावित आदेश बजावण्यात आलेले आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे येथील वैद्यकीय अधिकारी यांनी असे कळविले आहे.की सन २०१६-१७ या कालावधीत १९४६२ बाहय रुग्ण व सन-२०१७-१८ (एप्रिल २०१७ ते नोव्हेंबर, २०१७) या कालावधीत १०,८७८ बाहय रुग्ण असल्याचे कळविलेले आहे.

(५) होय, दोषी आढळलेल्या मे. डुकॉल ऑरगॉनिक्स ॲण्ड  कलर्स प्रा.लि.या उद्योगास दिनांक १८.०८.२०१७ रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.तसेच दिनांक ९/११/२०१७ रोजी मा.मंत्री (पर्यावरण) व सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या संयुक्त पहाणीत तळोजा येथील सामुहीक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा पूर्ण क्षमतेने चालवित नसल्याचे निदर्शनास आले होते त्यानूसार सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा चालविणे व देखभाल यावर

नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी व्यवस्थितरित्या पार न पाडल्यामुळे प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई येथील ५ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील पात्र विद्यार्थी गणवेशाच्या अनुदानापासून वंचीत असल्याबाबत

**(१६) * ९९०७१ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील सुमारे १४ हजार पात्र विद्यार्थी गणवेशाच्या अनुदानापासून वंचीत राहणार असल्याचे दिनांक ४ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासननिर्णयानुसार वस्तू रूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण अनुदान स्वरूपात थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याने विद्यार्थाच्या बँक खात्यावर गणवेशाची रक्कम जमा करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरूर तालुक्यातील विद्यार्थ्यांची बँक खाती शाळेमध्येच असतानाही १४ हजार विद्यार्थी शाळा सुरू झाल्यानंतर १५ दिवसांपर्यंत गणवेशापासून वंचीत होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सर्व शिक्षा अभियानांतर्गत पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळा सुरु होण्यापूर्वीचे गणवेश खरेदी केले असल्यामुळे विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहीले नाहीत. तथापि, काही पात्र विद्यार्थ्यांची बँकेत खाती न उघडल्यामुळे त्यांच्या खात्यावर योजनेच्या लाभाचे पैसे वर्ग करता आलेले नाहीत. तथापि, सदर लाभार्थ्यांचे बँकेत खाते उघडण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव (जि.जळगांव) येथील हाफकिन युनिट बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(१७) * ९७६६८ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव (जि.जळगांव) येथील हाफकिन युनिटमध्ये सर्दी-खोकला पासून पोलिओ पर्यंत विविध रोगांवरील लसी व औषधे बनविण्याची संपूर्ण यंत्रणा असताना तसेच उक्त युनिटला शासनाकडून पुरेशा ऑर्डर असतानाही व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन मंडळ यांच्याकडून उक्त युनिट बंद करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाब हाफकिनच्या कर्मचारी संघाने मा. पालकमंत्री तसेच मा.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री यांच्याही निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हाफकिनचे जळगाव युनिट बंद करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार युनिट बंद न करता सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हाफकिन महामंडळाची सहयोगी कंपनी असलेल्या हाफकिन अजिंठा फार्मा लि. जळगांव युनिटमध्ये केवळ क्षार संजिवनी, प्रतिजैवके, ज्वरनाशकाची औषधे, मानसोपचार औषधे, क्षयरोग औषधे, पोटदूखी व ॲलर्जीवरील औषधे यांचे उत्पादन करण्यात येते. सदर युनिटमध्ये पोलिओची लस अथवा इंजेक्शन यांचे उत्पादन करण्यात येत नाही. हाफकिन व्यवस्थापकीय संचालक मंडळाकडून हाफकिनचे जळगाव येथील युनिट बंद करण्याबाबत कोणतेही निर्देश देण्यात आलेले नाहीत.
(२) होय.
(३) हाफकिनचे जळगाव येथील युनिट बंद करण्यात आलेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रुईखैरी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील पाणी पुरवठा विहीरीमध्ये दुषीत पाणी जात असल्याबाबत

**(१८) * १०१२४६ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) मतदारसंघातील ग्रा.प. रुईखैरी येथील पाणी पुरवठा विहीरींमध्ये दूषित पाणी जात असल्याबाबत तसेच मौजा बोरखेडी (फाटक) येथील मंजूर पाणी पुरवठा योजनेंतर्गत बोथली, वाकेश्वर, बोरखेडी व मोहगांव येथे पाणी पुरवठा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, हिंगणा यांनी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा जि.प. नागपूर यांना दिनांक ८ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीकडून दि.४/८/२०१७ रोजी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) ग्रामपंचायत रुईखैरी येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे २ स्त्रोत विहीरी असून, त्यांच्या पाण्याचे नमुने भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत तपासण्यात आले असून, त्यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार पाणी पिण्यायोग्य असल्याचे आढळून आले आहे.

बोरखेडी फाटक या गावाचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समावेश करण्यात आला असून त्यास दि. ६/११/२०१७ रोजी मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे सदर योजनेत इतर ४ गावांचा समावेश करण्यात आला नाही.

तथापि, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम, टप्पा-२ अंतर्गत ४ गावांचा समावेश करण्याकरता पूर्व व्यवहार्यता अहवाल सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदगांव व चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील ४२ गावांना प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे सुरळीत पाणी पुरवठा होण्याबाबत

**(१९) * १०२२९१ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगांव व चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील ४२ गावांच्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेची विद्युत देयके महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने न भरल्यामुळे या योजनेचा विद्युत पुरवठा वीज वितरण कंपनीमार्फत खंडित करण्यात आला असून या योजने अंतर्गत असलेली गांवे माहे ऑगस्ट, २०१७ पासून पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजना देखभाल दुरुस्ती (ओ.अँड एम.) अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत चालविण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी, नांदगांव यांनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्याकडे दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार उक्त गावांना सुरळीत पाणी पुरवठा होण्याबाबत तसेच उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, अंशत: खरे आहे

मंजूर योजनेअंतर्गत योजनेची देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी निधीची तरतूद व उपलब्धता नसल्याने माहे जून २०१७ पासून योजनेची विद्युत देयके महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत भरण्यात आलेली नाहीत. तथापि, योजनेचे कार्यान्वयन करून योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दि. १.११.२०१३ पासून टप्प्या टप्प्याने गावांना पाणी पुरवठा करून दि. ३१.७.२०१७ पर्यंत चालवून सुध्दा जिल्हा परिषद, नाशिक यांनी निरंतर पाठपुराव्या नंतरही हस्तांतरीत करून न घेतल्याने दि. १.८.२०१७ पासून योजनेव्दारे पाणी पुरवठा बंद करण्यात आलेला आहे. योजनेतील समाविष्ट गावांना स्थानिक उदभवाव्दारे संबंधित ग्रामपंचायतीमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे,

(३) सदर मागणीचे अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांचा अहवाल सादर केला आहे.सदरची योजना जिल्हा परिषद, नाशिक यांनी हस्तांतरीत करून घेऊन चालविणे आवश्यक असल्याने योजना हस्तांरित करणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देव्हाडी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(२०) * १०१४९७ श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देव्हाडी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील मुख्यमंत्री पेयजल योजनेवर सन २००३ ते २०१४ या कालावधीत रूपये ३ कोटी एवढी रक्कम खर्च केल्यानंतर उक्त योजना पूर्ण करण्यात आली होती. तथापि, तद्नंतर संबंधित विभागाने उक्त योजनेकडे दुर्लक्ष केल्यामुळे सदरहू योजना आता बंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त योजना योग्य रीतीने सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली व उक्त योजनेकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

देव्हाडी (ता.तुमसर, जि.भंडारा) ही योजना वर्धीत वेग कार्यक्रमांतर्गत घेऊन दिनांक २५.८.२००८ रोजी कार्यान्वीत करण्यात आली होती. मात्र सदर योजनेच्या हस्तांतरणाकरिता संयुक्त पाहणी व वारंवार पाठपुरावा करुनही जिल्हा परिषदेने सदर योजना हस्तांतरीत करुन न घेतल्यामुळे बंद आहे.

(२) सदर योजना पूर्ववत सुरु करण्याकरिता मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत देव्हाडी (ता.तुमसर, जि.भंडारा) या नळ पाणी पुरवठा योजनेचे पुनरुज्जीवन करण्याच्या रु.६९.५५ लाख इतक्या रकमेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे. सदर योजनेची कामे सुरु करण्यात आली असून योजनेतून लवकरच पाणी पुरवठा सुरु करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद व खाजगी अनुदानित शाळांमधील मुलांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराची तपासणी करण्याबाबत

**(२१) * ९७६७९ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील सुमारे तीन साडेतीन हजार जिल्हा परिषद शाळा तसेच सातशे खाजगी अनुदानित शाळांमधील मुलांना देण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या पोषण आहाराची तपासणी करण्याची मागणी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हापरिषद सदस्यांनी केली असता या प्रकरणी अहवाल सादर करण्याचे आदेश मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने धान्यादी मालाची तपासणी केली असता, प्रयोगशाळा तपासणी अहवालानुसार तांदूळ व धान्यादी माल खाण्यास योग्य असल्याबाबत अहवाल प्राप्त झाला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाटाव (ता.रोहा,जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यातून होणाऱ्या प्रदूषणाबाबत

**(२२) * १००६१८ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीतील रसायनिक कारखान्यातून रसायनयुक्त सांडपाणी वारंवार नदीत सोडले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाटाव येथील रासायनिक कंपन्यांनी रसायनयुक्त पाणी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पडलेल्या मुसळधार पावसाच्या पुराचा फायदा घेत कुंडलिका नदीच्या पात्रात सोडले व धुक्याचा फायदा घेऊन हवेत प्रदुषित वायू सोडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्यातून सोडण्यात आलेले रसायनयुक्त सांडपाणी शेतात शिरल्याने शेतीचे नुकसान झाले असून नागरिकांना त्वचेचे विकार होत आहेत तसेच कुंडलिका नदीतील मासे मृत्यूमुखी पडल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार रसायनिक कारखान्यातून वारंवार होणारे प्रदूषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेत संबंधि दोषी कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) औद्योगिक वसाहतीतील हर्बर्ट ब्राऊन कंपनीत वायूगळती होऊन स्फोट झाल्याबाबत

**(२३) * ९७९५६ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) एमआयडीसी फेज २ येथील हर्बर्ट ब्राऊन कंपनीत दिनांक ३० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास सायंकाळी वायूगळती होऊन स्फोट झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची तक्रार प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रदुषण नियंत्रण मंडळाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य कल्याण यांचेकडुन प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधीन कंपनीकडून रसायनाची हाताळणी करताना रसायनाचा हवेशी संपर्क होवून धुर/वायूच्या वाफा निघाल्या होत्या. यासंदर्भात हर्बर्ट ब्राऊन उद्योगास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक ०६.०९.२०१७ रोजी प्रस्तावित आदेश बजाविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्जुननगर (ता.काटोल, जि.नागपूर) येथील महात्मा फुले मागासवर्गीय प्राथमिक शाळेने केलेल्या अपहाराबाबत

**(२४) * १०१०२९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्जुननगर (ता.काटोल, जि.नागपूर) येथील महात्मा फुले मागासवर्गीय प्राथमिक या शाळेने शाळा स्थलांतरासंदर्भातील शासन निणर्य क्र.प्राशास्थ १८१०/७०८/१०/प्रा.शि-३ शालेय शिक्षण विभाग दिनांक १७ जुलै, २०१३ अन्वये अवैध आदेश काढून सदरहू शाळा गुलशननगर नागपूर येथे स्थलांतरीत केल्याचे दाखवून शासनाची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळेच्या पत्त्यात बदल करुन अवैध शाळा आदेश पत्र क्र.१८१०/७०८/१०/प्रा.शि-३ दिनांक १९ ऑगस्ट, २०१४ अन्वये १५ शिक्षकांचे ६,३४,७११/- एवढया रक्कमेचे वेतन काढण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार निधीचा अपहार करणाऱ्या संस्थाचालक व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) सदर दिनांक १७ जुलै, २०१३ चे आदेश अवैध असल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत ४० पाणीपुरवठा योजनांना मंजूरी देताना झालेला गैरव्यवहार

**(२५) * १०१५२६ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात मुख्यमंत्री पेयजल योजनेअंतर्गत ४० पाणीपुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली असून माहे फेब्रुवारी, २०१७ पासून मंजूर योजनांची कामे संबंधीत कार्यकारी अभियंत्यांच्या दिरंगाईमुळे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास गठ्ठा पद्धतीने निविदा प्रसिद्ध करण्याचे मार्गदर्शन मागितले असता प्रधान सचिवांनी आदेशात नमुद अटी-शर्तीनुसार निविदा प्रसिद्ध करण्याची सूचना दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मार्गदर्शनात कुठेही गठ्ठा पद्धतीने निविदा प्रसिद्ध करण्याचा उल्लेख नसताना कंत्राटदारांशी संगनमत करुन कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी ४ ते ५ योजनांकरिता गठ्ठा पद्धतीने निविदा प्रसिद्ध करुन त्यामध्ये शासन निर्देशांच्या विरोधात अटी-शर्ती नमुद केल्याची तक्रार सुशिक्षित अभियंता व नोंदणीकृत कंत्राटदार संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे. गोंदिया जिल्ह्यातील ४० नळ पाणी पुरवठा योजनांना विविध टप्प्यामध्ये मान्यता देण्यात आली असून अंतिम मंजुरी दिनांक ४ जुलै, २०१७ रोजी देण्यात आली आहे. दिनांक १ जुलै, २०१७ रोजी जीएसटी लागू झाल्याने दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ च्या वित्त विभागाच्या शासन परिपत्रकातील सूचनानुसार दिनांक २८.०८.२०१७ रोजी प्रसिध्द केलेली निविदा रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर गोंदिया जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणूक आदर्श आचार संहिता लागू झाल्यामुळे वेळेत ई-निविदा प्रसिद्ध करणे शक्य झाले नाही. त्यामुळे दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७ रोजी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे. दिनांक १४ जून २०१७ रोजी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या योजनांची ई-निविदेची कार्यवाही गठ्ठा पध्दतीने करण्याबाबतचे मार्गदर्शन मागितले होते. त्यानुषंगाने सदर योजनांच्या अंमलबजावणीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असल्याने ते सदर योजनांच्या निविदाबाबत निर्णय घेण्यास सक्षम असल्याचे दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) व (४) दिनांक ०१ सप्टेंबर, २०१७ रोजी सुशिक्षीत अभियंता व नोंदणीकृत कंत्राटदार संघटनेने तक्रार केली आहे. मात्र सदर योजनांच्या अंमलबजावणीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असून ई-निविदेच्या अटी व शर्तीचे प्रारुप तयार करुन ती दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्याबाबत

**(२६) * १००७९० श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूंज (जि.औरंगाबाद) औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांचे सांडपाणी उघड्यावर सोडले जात असून सदर पाणी जमिनीत पाझरून जमिनीतील जलसाठे व हात पंपाचे पाणी दुषित झाले असल्यामुळे रांजणगाव व परिसरातील

गावातील नागरिकांना पोटदुखी, खोकला, अंगाला खाज येणे आदी अनेक आजार होत असून याबाबतच्या तक्रारी ग्रामस्थांनी वारंवार केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पैठण (जि.औरंगाबाद) येथील औद्योगिक वसाहती मधील "मेट्रिक्स प्रा.ली., बी.बी.केमिकल्स, क्रिस्टल केमिकल्स आदी अनेक रासायनिक कारखान्यातून उत्सर्जित होणाऱ्या दुषित गंध व रसायनामुळे परिसरातील मुधलवाडी, पिंपळवाडी, वाहेगाव, नारायणगाव, कातपूर, इसारवाडी या गावातील ग्रामस्थांना कायम स्वरूपी दमा, खोकला विविध श्वसन विकार झाले असून उक्त कारखान्या मध्ये अनेक वेळा स्फोट होऊन कामगार मृत्युमुखी पडले असल्याने या कारखान्याच्या विषारी रसायनांमुळे व  वायू मुळे मोठी जीवित हानी भविष्यात होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच  मौजे चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथून सेवन्हील, टीव्ही सेंटर चौक ते गजानंद मंदिर व शेजारी अनेक ठिकाणच्या परिसरामध्ये विषारी वायू हवेत सोडण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यामध्ये  विषारी वायूंचे हवेतील प्रमाण मोजणारी यंत्रणा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त कारखान्यांकडून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याबाबत व जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्याकरिता कायम स्वरूपी उपाय योजना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) अशंत: खरे आहे.

(२) वैदयकिय अधिकारी, पैठण यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार पैठण औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक उद्योगामुळे परिसरातील ग्रामस्थांना कायमस्वरुपी श्वसनाचे विकार झाल्याचे आढळून आले नाही.

सॅटेलाईट फॉर्मास्युटीकल, पैठण, जि.औरंगाबाद या कारखान्यात दिनांक २३.०६.२०१६ रोजी रसायनांचा स्फोट होवून कारखान्यातील कामगाराचा मृत्यू झाला होता. याबाबत संबंधित कारखान्यावर फौजदारी खटला दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) सन २०११ पासून औद्योगिक वसाहत, वांळूज येथे कायमस्वरुपी रासायनिक सांडपाणी सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच जिल्हयातील प्रदूषण कमी करण्याकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारखान्याची वेळोवेळी तपासणी करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मान्यता रद्द झालेल्या डी.एड. व डि.टी.एड. कॉलेजची अनामत रक्कम संस्थाचालकांना परत करणेबाबत

**(२७) * १००९५१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील डी.एड. व डि.टी.एड. कॉलेजची मान्यता मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेयान्वये रद्द झाल्याने शालेय शिक्षण विभागाच्या महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडे अनामत असलेली रक्कम सर्व संस्थाचालकांना परत करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांचेकडे दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक संस्थाचे लाखो रुपये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने संस्था चालकांची अनामत रक्कम परत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे.
(२), (३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या संस्थांना विद्यार्थी पुरविण्याकरीता प्रवेश प्रक्रिया अवलंबण्यासाठी संबंधीत संस्थेकडून प्रवेश प्रक्रिया शुल्क घेण्यात आले आहे. त्यामुळे ते परत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२८) * १०२३६६ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील क्रीडा संकुलाचे काम गत १० वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलाच्या कामास सन २००५ मध्ये प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती तसेच त्यासाठी मंजूर झालेला निधी अखर्चित राहिल्याने परत करावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त क्रीडा संकुलासाठी मौ.हातकणंगले येथील भूमापन क्र.९६६ मधील जागा जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत झाल्याचे निदर्शनास आल्याने तहसील कार्यालय, हातकणंगले यांचे दिनांक ६ जानेवारी, २००९ रोजीच्या आदेशान्वये शासनास जमा करण्यात आली असून उक्त जागा प्राप्त करुन घेण्याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, यांचे मार्फत सुरु करण्यात आलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर संकुल उभारणीसाठी मौजे हातकणंगले येथील भुमापन क्रमांक ९६६ मधील २.५० हेक्टर जमीन दिनांक २७.५.२००४ रोजी ९९ वर्षाचे भाडेपट्ट्याने नाममात्र रु.१/- भाड्याने प्राप्त झाली होती. परंतु सदर जागा जिल्हाधिकारी यांचे पुर्वपरवानगीशिवाय हस्तांतरीत झाल्याचे निदर्शनास आल्याने तहसील कार्यालय, हातकणंगले यांचे दिनांक ६.१.२००९ च्या आदेशान्वये परस्पर सरकार जमा करण्यात आली आहे. तथापी सदर बाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, कोल्हापूर कार्यालयास अथवा तालुका क्रीडा संकुल समितीस कळविण्यात आले नाही.

त्यामुळे हातकणंगले तालुका क्रीडा संकुलासाठी दुसरी जागा मिणचे येथील गायरान गट क्र.४९९ मधील सलग ७ एकर जागा ही ग्रामपंचायत मिणचे यांनी जनरल ग्रामसभा विषय क्र.१० दि.२६.०१.२०१७ ठराव क्र.१२२ चा जरुरी पुरता उतारा अन्वये जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचे पूर्व परवानगीने देणेस मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने तहसिलदार हातकणंगले यांचे कडे जागा हस्तांतरण करणे बाबतचा प्रस्ताव दि.२७.०५.२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे. सदर जागा प्राप्त करुन घेण्याबाबत तालुका क्रीडा अधिकारी, हातकणंगले यांच्यामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मंजूर क्रीडा संकुलासाठी कृषी विभागाची जागा मिळणेबाबत

**(२९) * १००८८७ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मंजूर क्रीडा संकुलासाठी दौंड येथील कृषी विभागाची जागा (गट नं.६६/१ एकूण क्षेत्र ३६ एकर) मिळणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ वा त्यापूर्वी देखील मा.क्रीडा मंत्री तसेच सचिव, क्रीडा विभाग यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्रीडा संकुलाला शासनाने तत्वता मान्यता देखील दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागाची जागा क्रीडा संकुलाला मिळणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कृषी विभागाकडे जागा मागणी करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा योजना व लघु सिंचन विभागामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३०) * १०२६८२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागात सन २०११-१२ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा योजना व साहित्य खरेदीत ३ कोटी १० लाख ४५ हजार ५१६ रुपयांची तर लघु सिंचन विभागात १ कोटी ४१ लाख २७ हजार ४७४ रुपयांची अनियमितता झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सदरील रक्कमा या सन २०११-१२ स्थानिक निधी लेखा परीक्षण अहवालात दर्शविण्यात आलेल्या तात्पुरत्या/अंतिम स्वरुपातील अमान्य रक्कमा आहेत.

(२) सन २०११-१२ या वित्तीय वर्षात लेखा परिक्षण अहवालानुसार तात्पुरत्या / अंतिम स्वरुपात रक्कमा अमान्य केल्याचे व तात्पुरती अनियमितता झाल्याची लेखा परीक्षणात आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. सदरील लेखा परीक्षण आक्षेपाचा अनुपालन अहवाल तयार करुन आक्षेप वगळण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगांव (जि.गोंदिया) येथील नेहरु सेवा सहकारी सोसायटी व पूर्ती शेती उद्योग साधन सामुग्री पुरवठा खरेदी-विक्री सोसायटीने धान विक्रीत केलेला गैरव्यवहार

**(३१) * ९७०८९ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (जि.गोंदिया) येथील नेहरु सेवा सहकारी सोसायटी व पूर्ती शेती उद्योग साधन सामुग्री पुरवठा खरेदी विक्री सोसायटी यांनी कागदोपत्री धान खरेदी केल्याचे दाखवून गैरव्यवहार केला याबाबत धान विक्री शेतकऱ्यांनी (अडत्यांनी) संबंधित जिल्हाधिकारी, डी.सी.सप्लाय अधिकारी, नागपूर व विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे लेखी तक्रार केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, याबाबत ईमेल द्वारे तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) सदर प्रकरणी मार्केटिंग फेडरेशन मार्फत स्वंतत्रपणे चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालात खरेदीमध्ये अनियमितता आढळून आली नाही, परंतु प्रत्यक्ष खरेदी करण्यात आलेला धान व गिरणीमालकांना देण्यात आलेला धान यामध्ये घट आल्यामुळे घटीची रक्कम मार्केटिंग फेडरेशनकडून मंजूर घट वजा जाता, सदर संस्थेला देय असलेल्या प्रशासकीय खर्चातून वसूल करण्यात आली आहे. तसेच, जिल्हा मार्केटिंग अधिकारी, गोंदिया यांनी सदर संस्थेकडून रब्बी हंगाम २०१६-१७ चे धान खरेदीचे काम दिनांक १४.४.२०१७ च्या आदेशान्वये काढून घेतले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहिणखेड (ता.मोताळा, जि.बुलडाणा) व १२ गावांचा पाणीपुरवठा बंद असल्याबाबत

**(३२) * ९६०४६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहिणखेड (ता.मोताळा, जि.बुलडाणा) व १२ गावांचा पाणीपुरवठा योजनेव्दारे होणारा पाणी पुरवठा संबंधीत कंत्राटदाराने दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ पासुन बंद केला असल्याची बाब दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठकिाणचा पाणी पुरवठा बंद केल्यामुळे रोहिणखेड व १२ गांवे पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त ठिकाणी पाणी पुरवठा योजना त्वरित सुरू करणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

कंत्राटदाराने दिनांक २५/१०/२०१७ रोजी देखभाल दुरुस्तीकरीता आवश्यक निधी नसल्याचे कारणास्तव पाणी पुरवठा बंद केला होता.

(२) हे खरे नाही.

(३) सर्व ग्रामपंचायत व जिल्हा परिषद समवेत बैठक घेऊन पाणी पुरवठा तात्काळ सुरळीत सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सर्व ग्रामपंचायतींना योजनेची पुढील कामे व देखभाल दुरुस्ती सुरु ठेवण्याकरीता शिखर समिती स्थापन करण्याकरीता मार्गदर्शन करण्यात आले. व दिनांक २६/१०/२०१७ पासून सुरळीत पाणी पुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंजनगाव (जि.अमरावती) पंचायत समितीने निर्मलग्राम योजनेंतर्गत गवंडी प्रशिक्षण शौचालय बांधकामामध्ये केलेला गैरव्यवहार

**(३३) * ९९४२७ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव (जि.अमरावती) पंचायत समितीने निर्मलग्राम योजनेंतर्गत गवंडी प्रशिक्षण शौचालय बांधकाम संपूर्ण तालुक्यात राबवून तालुका शौचालय मुक्त झाला असे दाखविल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना राबविण्यात आल्याचे कागदोपत्री दाखवून या योजनेखाली शौचालय बांधकाम व गवंडी प्रशिक्षणाची देयके नियमबाहयरितीने ऑफ लाईन पध्दतीद्वारे अदा करण्यात आली असून यामध्ये लाखो रुपयांचा अपहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

तथापि अशा आशयाचे वृत्त दिनांक २१.१०.२०१७ रोजी दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.

(२) हे खरे नाही.

अंजनगांव सुर्जी अधिनस्त एकूण ४९ ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी ११ ग्रामपंचायतींमध्ये १२ गवंडी प्रशिक्षण देण्यात आले. प्रति प्रशिक्षण ५० शौचालय बांधकामाचे उद्दीष्ट होते. ९ ग्रामपंचायतींनी गवंडी प्रशिक्षणासाठी त्यांना वितरीत केलेला निधी खर्च केलेला आहे.त्याची प्रमाणके व गवंडयांची स्वाक्षरी दप्तरी उपलब्ध आहेत. दहिगांव ग्रामपंचायतीमध्ये पूर्ण ५० लाभार्थी नसल्याने सदर निधी अखर्चीत राहिला आहे. उर्वरीत ग्रामपंचायतीमध्ये गवंडी प्रशिक्षणासाठी स्थानिक गवंडी उपलब्ध असल्याने खर्च झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यात शालेय स्तरावर “मुख्य निकाल क्षेत्र” (केआरए) पध्दत राबविण्याबाबत तसेच उस्मानाबाद जिल्हा परिषद शाळेमध्ये सोलार पॅनल पुरवठा करण्याबाबत

**(३४) * ९८४८८ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील शालेय स्तरावर “मुख्य निकाल क्षेत्र” (केआरए) पध्दत राबविण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उस्मानाबाद जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक अशा एकूण १०९३ शाळा असून मा.मुख्यमंत्री यांनी शिक्षण विभागास दिलेल्या (केआरए) “मुख्य निकाल क्षेत्र” उद्दिष्टाप्रमाणे सर्व शाळा डिजीटल होणे अपेक्षित असूनही बऱ्याच जिल्हा परिषद शाळेची विद्युत देयके थकीत असल्यामुळे तेथील विद्युत पुरवठा खंडीत केल्याने उक्त शाळांना सोलार पॅनलचा पुरवठा करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी उस्मानाबाद यांनी दिनांक १० जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केआरए पध्दतीत किती व कोणती उद्दीष्टे ठेवण्यात आली आहेत व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने उस्मानाबाद जिल्हा परिषद शाळेमध्ये सोलार पॅनल पुरवठा करण्याबाबत व राज्यात केआरए पध्दत राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) शासनाकडे सदर मागणी प्राप्त झालेली नाही. तथापि सभापती, कृर्षी, पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दि.२३ मे, २०१७ च्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.उस्मानाबाद यांच्याकडे या संदर्भात माहितीची मागणी केलेली आहे.

(३) मा.मुख्यमंत्री महोदयांनी विभागास पुढीलप्रमाणे KRA संदर्भात उद्दिष्टे दिले असून त्या संदर्भात विभागवार बैठका घऊन नियोजन करण्यात येत आहे.

१. खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश संदर्भात विद्यार्थी व पालक यांना त्रास न होता संपूर्ण प्रक्रीया ही पारदर्शक Digital पध्दतीने व सुलभपणे होण्याकरीता योग्य ते नियोजन करुन सुधारणा करणे.

२. ASER evauation प्रमाणे सर्व जिल्हे सातारा जिल्हयाच्या २०१६च्या मानांकनानुसार आणणे.

३. वर्षात ४ बाहय परीक्षा/चाचणी घेऊन पालकांना कळविणे.

४. इयत्ता १ ली ते १०वी तील विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकसित करणे.

५. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ७५% प्राथमिक शाळांना प्रगत करणे.

६. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ५०% उच्च प्राथमिक शाळांना प्रगत करणे.

७. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत माध्यमिक स्तर माध्यमिक शाळांना प्रगत करणे.

८. Aग्रेड मध्ये नसलेल्या शाळांनी किमान १श्रेणी वाढ करणे. तसेच ३३ % शाळा A ग्रेड मध्ये आणणे.

९. इयत्ता नववी ते दहावीमधील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत ५०% नी कमी करणे.

१०. सर्व शाळा डिजिटल करणे (१००%).

११. २५% शाळांमध्ये बायोमॅट्रीक लागू करणे. (Thump impression / Facial Recognition )

१२. राज्यातील १००० प्रगत शाळांमधील १००% विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी रुजविणे.

(४) सद्य:स्थितीत उस्मानाबाद जिल्हा परिषद शाळेमध्ये सोलार पॅनल पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही व राज्यात केआरए पध्दत राबविण्याबाबत विभागवार आढावा बैठका घेऊन नियोजन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई शहरातील जल व वायू प्रदूषण रोखण्याबाबत.

**(३५) * ९५६९९ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीतील अनेक रासायनिक कंपन्या तसेच ठाणे औद्योगिक वसाहतीमधील ८३ कंपन्या नियमांचे उल्लंघन करुन रात्री विषारी गॅस वातावरणात सोडत असून रासायनिक पाणी प्रक्रिया न करताच नवी मुंबईतील नाल्यांमध्ये सोडत असल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) तसेच नवी मुंबईमध्ये हजारो वाहनांमुळे मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वायू प्रदूषणाबरोबरच एमआयडीसी क्षेत्रातील रासायनिक कारखान्यातील दुषित पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते पाणी नवी मुंबईतील नाल्यामंध्ये सोडण्यात येत असल्याने जल प्रदूषण वाढले असून त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांची नावे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि एमआयडीसीलाही पालिकेने कळविली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शहरातील वायू व जलप्रदूषण रोखण्याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी, ऐरोली यांनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.पर्यावरण मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नवी मुंबई शहरातील वायू आणि जल प्रदूषण रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या व संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही. तथापि, याबाबतचे वृत्त दिनांक १२/०९/२०१७ रोजी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.

(२) हे अशंत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे आहे.

(६) सदर निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई महानगरपालिका व सीईटीपी यांच्या प्रतिनिधीव्दारे माहे सप्टेंबर २०१७ मध्ये ८३ उद्योगांच्या केलेल्या संयुक्त पाहणी दरम्यान कोणत्याही उद्योगाचे औद्योगिक सांडपाणी थेट नाल्यात मिसळत असल्याचे आढळून आले नव्हते. तथापि, माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या स्तरावर करण्यात आलेल्या पाहणीत क्राऊन पेट्रोलियम प्रोडक्टस या उद्योगाकडून औद्योगिक सांडपाणी नाल्यात सोडले जात असल्याने सदर उद्योगास उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच ४ उद्योगांनी संमती पत्राच्या अटींची पुर्तता न केल्यामुळे सदर उद्योगांना प्रस्तावित आदेश व ५ उद्योगाना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांमधील केलेली नियमबाहय शिक्षक भरती

**(३६) * ९९२५२ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक भरतीस पूर्णपणे बंदी असताना सर्वच जिल्हयांमध्ये ७ हजारापेक्षा जास्त शिक्षकांच्या करण्यात आलेल्या नियमबाहय भरतीमध्ये प्राथमिक ४८८, माध्यमिक २ हजार ८०५ व उच्च माध्यमिक ७१८ अशा एकूण ४ हजार ११ शिक्षकांच्या मान्यता नियमबाह्य असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीकडून २ मे, २०१२ नंतर देण्यात आलेल्या शिक्षक मान्यतेच्या चौकशीत ४ हजार ११ मान्यतेमध्ये ना हरकत प्रमाणपत्र नसणे, पदाची जाहिरात प्रसिद्ध न करता नियुक्ती करणे, रोस्टर न पाळणे अशा प्रकारच्या अनियमितता निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त नियमबाहय भरती करण्यात आलेल्या शिक्षकांच्या वेतनावर शासनाच्या तिजोरीतून ९७ कोटी रुपये खर्च झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त शाळांमधील शिक्षकांच्या नियमबाह्य नियुक्त्या रद्द करुन त्यांच्याकडून वेतन वसूल केले जाणार आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार दोषी आढळलेल्या अधिकारी संचालकांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे.

(४) चौकशीनंतर मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## दिघंची (ता.आटपाडी, जि.सांगली) नळ पाणीपुरवठा योजनेची चौकशी करण्याबाबत

**(३७) * ९६६२७ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघंची (ता.आटपाडी, जि.सांगली) नळ पाणीपुरवठा योजनेची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर विभाग यांच्यामार्फत चौकशी करण्याचे आदेश माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर नळ पाणीपुरवठा योजनेची तातडीने दुरूस्ती करण्याबाबत व नागरिकांना नियमितपणे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे दिघंची ता.आटपाडी, जि.सांगली येथील भारत निर्माण योजनेअंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली या कार्यालयामार्फत करणेत आली आहे. योजनेच्या झालेल्या कामाच्या निकृष्ठ दर्जा बाबत चौकशी व अनियमिततेबाबत अधिक्षक अभियंता, गुणनियंत्रण व दक्षता पथक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नविन प्रशासकीय इमारत पहिला मजला कन्हैयानगर ठाणे पुर्व यांचेकडून तपासणी करुन घेणेबाबत अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,सांगली यांना दि.०१/०९/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांनी कळविले आहे.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या कार्यालयास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्या बाबत कळविण्यात आले आहे. परंतु अद्याप अहवाल अप्राप्त आहे. तथापि शासकिय तंत्रनिकेतन मिरज या त्रयस्थ यंत्रणेकडून तपासणी करणेसाठी दि. २६/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले आहे. सदर तपासणीचा अहवाल प्राप्त होताच कार्यवाही करणेत येईल.

(३) महाडिकवाडी तलावातील उपसा विहिरीवरून करणेत आलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रातील वाळू खराब झाल्याने गेली दोन वर्षे बंद असल्याने वापरात न घेता निंबाळकर वस्ती तलावालगत असणाऱ्या याच गावच्या उद्धव विहिरीस पुरेसे पाणी उपलब्ध असल्याने सदर योजनेमधील दाबनलिका, उंच टाकी व वितरण व्यवस्था इत्यादी उपांगाचा वापर करुन गावठाण व योजनेमधील मंजूर वाड्या वस्त्यांना पाणी पुरवठा सुरु आहे.

पुर्ण झालेल्या योजनेमधील जलशुध्दीकरण केंद्रांमधील फिल्टरची वाळू बदलणे आवश्यक असल्याने ग्रामपंचायत दिघंची यांचेमार्फत १४ वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त निधी मधून सदर काम हाती घेणेत येत आहे. त्याचप्रमाणे योजनेत समाविष्ट नसलेल्या वाड्यावस्त्या व ज्या वाड्या वस्त्यांच्या ठिकाणी पाणी टंचाई निर्माण झालेली होती त्या ठिकाणी टँकरद्वारे दि.२४/०३/२०१७ ते दि.१५/०९/२०१७ या कालावधीमध्ये पाणी पुरवठा केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील मागासप्रवर्गातील व दारिद्रय रेषेखालील विदयार्थी गणवेशापासून वंचित राहिल्याबाबत

**(३८) * ९९३८६ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मागासप्रवर्गातील विद्यार्थी व दारिद्रय रेषेखालील शालेय विदयार्थ्यांना गणवेशासाठी देण्यात येणारी ४०० रुपयांची रक्कम थेट बँकेत जमा करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार पालकांनी गणवेश खरेदी करुन त्याची पावती शाळेकडे जमा केल्यानंतरच संबंधित विदयार्थ्यांच्या बँक खात्यात गणवेशाची रक्कम जमा होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील शाळांना पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने अर्धाच निधी दिला असल्याने २०० रुपयांत गणवेश उपलब्ध करण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे ऐन स्वांततत्रयदिनी विदयार्थ्यांना गणवेशापासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन भविष्यात विदयार्थी गणवेशापासून वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

लोहा तालुक्यातील एकूण १५८०४ विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी रु. ४००/- याप्रमाणे गणवेशाचा निधी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग करण्यात आला आहे.

(४) पात्र विद्यार्थ्यांची बँक खाते काढण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील पूरपरिस्थितीमुळे शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) देणाऱ्या उमेदवारांना परिक्षा देता न आल्याबाबत

**(३९) * १००२२९ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये माहे जुलै, २०१७ मध्ये झालेल्या पुरपरिस्थितीमुळे ३४ मार्ग बंद झाले असल्याने महाराष्ट्र राज्य शिक्षक, पात्रता परीक्षा (टीईटी) देणाऱ्या उमेदवारांवर याचा परिणाम झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुरपरिस्थितीमुळे परीक्षा केंद्रावर वेळेत पोहचता आले नसलेल्या ३०० हून अधिक परिक्षार्थ्यांना परीक्षेला बसण्याची परवानगी नाकारण्यात आल्यामुळे परिक्षार्थ्यांचे एक वर्ष वाया गेले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त परीक्षेला विहित वेळेमध्ये न पोहोचलेल्या उमेदवारांसाठी पुन्हा परीक्षा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) शिक्षक पात्रता परिक्षेचे आयोजन दिनांक २२/०७/२०१७ रोजी जिल्हयाच्या मुख्यालयी करण्यात आल्याबाबतची प्रसिध्दी दैनिक वर्तमानपत्रातून तसेच परिक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर करण्यात आली होती. तसेच परिक्षेकरिता वेळेवर उपस्थित राहण्याच्या सूचना परिक्षार्थीच्या प्रवेशपत्रावर देण्यात आलेल्या होत्या. परिक्षेस वेळेवर उपस्थित राहण्याची पूर्व कल्पना दिलेली असल्याने परिक्षेस उशिरा आलेल्या परिक्षार्थ्यांचे वर्ष वाया जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पुरपरिस्थितीमुळे परिक्षेपासून वंचित रहावे लागल्याबाबतच्या तक्रारी उमेदवारांकडून परिक्षा परिषदेस प्राप्त झाल्या नाहीत. तसेच परिक्षा देता न आलेल्या उमेदवारांनी पून्हा परिक्षा घेण्याबाबतची मागणी ही सदर परिषदेस प्राप्त झाली नाही.
सदर परिक्षा राज्यस्तरीय असल्याने, केवळ कोल्हापूरसाठी पून्हा परिक्षा घेण्याची मागणी आल्यास, ती मान्य करणे शक्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील अन्नपूर्णा शिधापत्रिका धारकांना धान्याचा पुरवठा बंद केल्याबाबत

**(४०) * १०१४०७ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानातून माहे मार्च, २०१७ पासून अन्नपूर्णा शिधापत्रिका धारकांना शासनाकडून मोफत पुरविण्यात येणारा धान्याचा पुरवठा बंद झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त जिल्ह्यातील लाभार्थ्यांना पूर्ववत धान्य पुरवठा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अन्नपुर्णा योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून माहे ऑक्टोबर, २०१५ पासूनचे नियतन राज्य शासनास उपलब्ध झालेले नाही. सदर योजना ही केंद्र शासनाची योजना असल्याने पुढील कालावधीसाठीच्या नियतनाची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली असून त्याबाबत पाठपुरावादेखील करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील १२ गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेत झालेली अनियमितता

**(४१) * ९५५२० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील १२ गावांत सन २०१७ मध्ये करण्यात आलेल्या भारत निर्माण कार्यक्रमातील पाणीपुरवठा योजनेत मंजूर निधीपेक्षा अधिक रकमेची देयके सादर केल्याचे तसेच सदर योजना १० वर्षापासुन अपूर्ण स्थितित असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच उक्त योजना पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील एकूण १४ योजनांपैकी ४ योजना अपुर्ण होत्या.

(२) व (३) चार अपूर्ण योजनांची कामे सबंधीत ग्राम पाणी पुरवठा समितीकडून करुन घेण्यात आली आहेत.

तसेच तफावत आढळून आलेल्या दोन समितीविरुद्ध गुन्हा नोंदविण्याबाबत गट विकास अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. एक समितीकडून जादाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तर एका समितीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमधील कला, शारीरिक शिक्षण आणि कार्यानुभव शिक्षकांच्या नियुक्तीबाबत

**(४२) * १००८३१ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १०० पेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या एकूण एक हजार ८३५ शाळांमध्ये कला, शारीरिक शिक्षण आणि कार्यानुभव या विभागांसाठी शिक्षक नेमण्याकरीता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने काढलेल्या अध्यादेशात या जागा भरताना मानधन न घेणा-यावर भर देण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२). असल्यास, यामुळे कला, शारिरीक शिक्षण व कार्यानुभव शिक्षकांमध्ये संतप्त भावना निर्माण झाली असून यासंदर्भात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक संघटनांनी दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ नुसार उच्च प्राथमिक शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांची नियुक्ती तसेच अतिथी निदेशकांचे पथक तयार करण्याबाबतचा शासननिर्णय ०१ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे.

याअन्वये अंशकालीन निदेशकांची पदे निर्माण करण्यास आणि घडयाळी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात पूर्ववत मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील भोसे व इतर ३९ गावांची प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(४३) * १०१६११ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील भोसे व इतर ३९ गावांच्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेस दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास प्रशासकीय मान्यता देऊनही अद्यापि सदर योजना प्रलंबित असून कार्यान्वित झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजना माहे ऑगस्ट, २०१७ पर्यंत पूर्ण करून योजना लोकांसाठी प्रत्यक्ष कार्यान्वीत करण्याचे मर्यादा आदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही उपरोक्त योजनेतील बरीचशी कामे प्रलंबित असून याबाबत संबंधित कंत्राटदार व पाणी पुरवठा विभाग यांचेकडून दिरंगाई होत असल्यामुळे त्या भागातील लोकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर पाणी पुरवठा योजना तातडीने पुर्ण करून ती कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली तसेच दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही

सदर योजनेमधील ४० गावांपैकी १५ गावांना चाचणी स्वरुपात मागणीनुसार पाणी पुरवठा सुरु आहे.उर्वरीत गावे मार्च,२०१८ अखेर कार्यान्वित करण्यात येत आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही, योजनेची सर्वसाधारणपणे ७७% कामे पूर्ण झाली आहेत.सदर योजनेमधील ४० गावांपैकी १५ गावांना चाचणी स्वरुपात मागणीनुसार पाणी पुरवठा सुरु आहे. उर्वरीत गावे मार्च,२०१८ अखेर कार्यान्वित करण्यात येत आहेत.

(४) व (५) भोसे प्रादेशिक योजनेमधील ४० पैकी १५ गावांना चाचणी स्वरुपात मागणी नुसार पाणी पुरवठा सुरु केला आहे. सदर योजनेची कामे प्रगतीपथावर असून उर्वरीत २५ गांवामधील १३ गांवे डिसेंबर, २०१७ अखेर व १२ गांवे माहे मार्च, २०१८ पर्यंत कार्यान्वित करण्याचे नियोजन केलेले असून संबंधित ठेकेदारास याबाबत समज देण्यात आलेली आहे. ठेकेदारास कामाची प्रगती वाढविण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे.

सदर योजने मधील सर्व गांवे कार्यान्वित करण्यास लागलेल्या विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत:-

१) जॅकवेल जाणेसाठीच्या जोडपुलासाठीच्या जागेबाबत स्थानिक गावकऱ्यांच्या हरकतीमुळे जागा उशिरा ताब्यात मिळली.

२) जलशुध्दीकरण केंद्रासाठी आवश्यक असणारी जागा एक वर्ष उशिराने मिळाली.

३) उंच टाक्या व जलशुध्दीकरण केंद्र बांधकामासाठी आवश्यक वाळू वेळेवर उपलब्ध झाली नाही.

४) सदर योजनेसाठी टप्याटप्याने आवश्यक असणारा निधी काही कालावधीत अंशत: उपलब्ध झाला.

-----------------

## रायगड जिल्हयात समुद्रकिनारी सीआरझेड व पर्यावरणाचे नियम डावलून अनधिकृतपणे केलेली बांधकामे

**(४४) * ९५१९५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील मुरुड व जंजिरा, बोर्ली, काशिद, बारशीव व नांदगाव समुद्रकिनारी सीआरझेड व पर्यावरण कायदयाचा भंग करुन अधिकारी व बांधकाम व्यावसायिकांशी संगनमत करुन अनधिकृतपणे अलिशान बंगल्यांची बांधकामे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) अलिबाग व मुरुड तालुक्यातील समुद्रकिनारी बांधण्यात आलेल्या अनुक्रमे १४५ व १६७ बांधकाम धारकांना महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, १९६६ वे कलम ५२, ५३, ५४ व ५५ तसेच, पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम ३ (१) प १५ अन्वये संबंधित तहसिलदाराकडून नोटीस बजावण्यात आल्या आहेत, सदर दाव्यांपैकी अलिबाग तालुक्यातील ६१ व मुरुड तालुक्यातील १०१ दाव्यांमधील अनधिकृत बांधकामाबाबत मा.न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश दिले आहेत.

सदर दोन्ही तालुक्यातील अनधिकृत बांधकामांपैकी अलिबाग तालुक्यातील ६९ व मुरुड तालुक्यातील ९५ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ व केंद्रिय पर्यावरण व वन

मंत्रालयाच्या दिनांक ६/१/२०११ रोजीच्या अधिसूचनेमधील निदेशांचे उल्लंघन केल्याचे संबंधिताविरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम ३(१) व १५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

-----------------

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात होत असलेला गैरव्यवहार

**(४५) * ९९३०४ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ.प्रकाश अतकरेंची स्वतंत्र समितीमार्फत चौकशी करण्याचा निर्णय घेतला असून चौकशी सुरु असतानाच मुक्त विद्यापिठाच्या तीन-तीन विभागाच्या पदांचा कार्यभार त्यांच्याकडे सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनास सदर चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, समितीच्या अहवालात कोणकोणत्या बाबी नमूद केल्या आहेत,

(५) त्यानुसार शासनाने संबंधित दोषी अधिकऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) विद्यापीठामध्ये गैरव्यवहार झाल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या आहेत. तसेच या संदर्भात तक्रारी विद्यापीठास प्राप्त झालेल्या आहेत.

(२) होय. कथित गैरव्यवहाराबाबतीत वृत्तपत्रातील प्रसिध्द बातम्यांच्या अनुषंगाने सत्यता पडताळून पाहण्यासाठी विद्यापीठाने डॉ.खडककार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती गठित केलेली आहे.

(३) होय. प्रश्नाधीन प्रकरणी डॉ.अतकरे यांच्या विरुध्द प्राप्त तक्रारींची तपासणीसाठी डॉ.नंदनवार यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली असून त्यापूर्वीच डॉ.अतकरे यांचा अनुभव विचारात घेऊन प्राध्यापक पदाबरोबरच विद्यापीठातील प्रभारी संचालक, विद्यार्थी सेवा या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.३१/०३/२०१७ पासून दिलेला आहे. तसेच विद्यापीठाच्या परिक्षा नियंत्रक पदाचा तात्पूरता कार्यभार दि.१४/०८/२०१७ रोजी देण्यात आला होता. त्यानंतर श्री.अतकरे यांना दि.२०/०९/२०१७ ते दि.०२/१०/२०१७ या कालावधीत कुलसचिव पदाचा कार्यभार देण्यात आला होता.

(४) नाही. वृत्तपत्रातील बातम्यांच्या अनुषंगाने स्थापित डॉ. खडककार समितीचा अहवाल अद्याप विद्यापीठास प्राप्त नाही. तथापि, प्रश्नभाग - ३ मध्ये नमुद डॉ.अतकरे प्रकरणी डॉ.नंदनवार समितीने अहवाल विद्यापीठास सादर केला असून विद्यापीठ स्तरावर छाननी सुरु आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ४३ नळपाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(४६) * ९६४६० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ४३ नळपाणी पुरवठा योजनेचे काम गत एक वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर नळपाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) सदर ४३ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. तालुकास्तरीय समितीने पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव, तसेच ग्राम पंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांच्या समवेत दिनांक ११.८.२०१७ रोजी बैठक घेऊन योजना पुर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच दिनांक २२.११.२०१७ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय बैठकीत सदर ४३ योजना पुर्ण करण्याच्या उप विभागीय अभियंता यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघरसह राज्यातील आदिवासी पाड्यावरील बंद करण्यात आलेल्या वस्तीशाळांतील स्वयंसेवक व शिक्षकांबाबत

**(४७) * ९८६८६ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पालघर जिल्ह्यातील आदिवासी पाड्यावरील बंद करण्यात आलेल्या वस्ती शाळांमधील शिक्षकांना प्राथमिक शाळामध्ये सामावून घेण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याने न्यायालयाच्या खंडपीठाने पालघर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षण अधिकाऱ्यांना नोटीस दिली असल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील इतर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक वस्तीशाळा बंद करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने “गाव पाडा तेथे शाळा” या धोरणानुसार वस्तीशाळा सुरु करून स्थानिक उमेदवारांच्या नेमणूका केल्या परंतु काही भागातील वस्तीशाळा बंद पडल्याने दिनांक १ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयानुसार उक्त उमेदवारांना सेवेत सामावून घेणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवून फक्त ८ स्वयंसेवकांना समावून घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्णया विरोधात वस्तीशाळा शिक्षकांनी याचिका दाखल करून न्यायालयाने त्यांना सेवेत घेण्याचा आदेश दिला असतानाही त्यावर जिल्हापरिषद पालघर, यांनी कुठलीही कार्यवाही न केल्याने वस्तीशाळा शिक्षकांनी मा.न्यायालयात दाखल केलेल्या अवमान याचिका संदर्भात मा.न्यायालयाने वस्तीशाळा शिक्षकांची नियुक्ती व समायोजनाबाबत दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास आदेश दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार उपरोक्त नमुद स्वयंसेवक व शिक्षकांबाबत तसेच उक्त बंद असलेल्या वस्तीशाळा पुर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) होय हे खरे आहे.
(४), (५) व (६) मा.उच्च न्यायालयाने चार आठवडयात जिल्हास्तरावर निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार निर्णय घेण्यात आलेला आहे.

-----------------

## सारफळी (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथे भूजल यंत्रणेची परवानगी न घेता पाणी पुरवठा विभागाने विहीरीचे खोदकाम केल्याबाबत

**(४८) * १००५३७ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सारफळी (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथे सन २०१६-१७ या वर्षामध्ये पाणी पुरवठा पुरक योजनेअंतर्गत पाणीपुरवठा व पाईपलाईन टाकणे या कामासाठी रूपये १० लक्ष मंजूर करण्यात आले असल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी पुरवठा विभागाने भूजल यंत्रणेकडून पाणीसाठा उपलब्धते बाबतचे प्रमाणपत्र न घेता उक्त ठिकाणच्या विहीरीचे खोदकाम केले असल्याने सदर विहीरीला पाणी लागले नाही त्यामुळे अनावश्यक खर्च झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली व उक्त ठिकाणी कायमस्वरूपी पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

सन २०१६-१७ मध्ये नळ पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती अंतर्गत रु.९,९५,५१०/- मंजूर करण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर कामात विहीरीचे काम प्रस्तावित नसल्याने, भूजल यंत्रणेकडून पाणीसाठा उपलब्धतेबाबतचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.

सदर ठिकाणी कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना अस्तित्वात असून, उन्हाळयात पाणी कमी पडत असल्यामुळे उर्ध्वनलिका व पॅनल बोर्डचे काम विशेष दुरुस्तीअंतर्गत करणे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भाईंदर (जि.ठाणे) येथील जेसल पार्क खाडीकिनारी खारफुटीची झाडे तोडून होत असलेले अनधिकृत बांधकाम

**(४९) * १०२९०४ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) येथील जेसल पार्क खाडीकिनारी खारफुटीची झाडे तोडून अनधिकृत बांधकाम केल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मेरीटाईम बोर्ड व महापालिकेचे कार्यकारी अभियंते तसेच दोन ठेकेदारांवर पर्यावरण संरक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी तहसिलदार ठाणे यांचे कार्यालयामार्फत चौकशी करुन पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ तसेच कलम १५(१) व कलम १५(२) अन्वये मिरा भाईंदर महानगर पालिकेचे कार्यकारी अभिंयता, मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे ऋषिकृती इन्फ्रा, मे.सुभाष कन्स्ट्रक्शन व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याविरुध्द नवघर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र.४०७ अन्वये दिनांक १०.११.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालीदेवद (सुकापूर) (ता.पनवेल, जि.रायगड) अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्षांनी केलेला गैरव्यवहार

**(५०) * ९५६२० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालीदेवद (सुकापूर) (ता.पनवेल, जि.रायगड) अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करून त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष यांनी ग्रामपंचायत हद्दीतील विकासक व नागरिकांकडून पाणीपट्टी व नवीन नळ जोडणी करीता वसूल केलेल्या निधीचा दुरूपयोग केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,कारवाईचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पाणी व स्वच्छता), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांची दिनांक ०६.१२.२०१७ च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत चौकशी सुरु असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयात कोट्यवधी रुपयांच्या शासकीय धान्याचा झालेला अपहार

**(५१) * ९९३२५ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील तहसिल कार्यालय, परभणी अंतर्गत पुरवठा विभागाच्या गोदामातून सुमारे २४ कोटी ९७ लाख रुपयांचे १९ हजार १४१ क्विंटल धान्य गायब झाल्याप्रकरणी तत्कालिन जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.संतोष वेणीकर यांच्या विरूध्द शासकीय धान्याचा अपहार केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या पथकाने केलेल्या गोदाम तपासणी अहवालानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या अंदाजे ४ कोटी ९७ लाख ६९ हजार ९२९ रुपये एवढया किंमतीच्या अन्नधान्याचा परभणी येथील शासकीय गोदामातून अपहार झाल्याची बाब माहे ऑगस्ट २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे.

सदर प्रकरणात दि.१३.८.२०१६ रोजी गु.र.नं. ३०५/१६ कलम ४२०, ४०९, ४६८, ४७१, ३४ सह कलम ३, ७ जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी श्री.संतोष वेणीकर तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांच्यासह १६ जणांविरुद्ध न्यायालयात दोषारोप क्र. १०३/१६, दि. ०९.११.२०१६ दाखल करण्यात आलेले आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. समितीच्या अहवालानुसार श्री.संतोष वेणीकर, तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांचे विरुद्ध म ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

-----------------

## कळंब (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील शासकीय गोदामातील धान्याचा झालेला गैरव्यवहार

**(५२) * ९६६०३ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील शासकीय गोदामामधून रूपये १ कोटी ३१ लाख ९६ हजार इतक्या किंमतीच्या ४९ टन धान्याचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धान्य गैरव्यवहारामध्ये अधिकारी वर्ग तसेच मोठ्या व्यापाऱ्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अप्पर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या नियंत्रणाखाली कळंब व येरमाळा येथील शासकीय धान्य गोदामांची दि.१९.०६.२०१७ ते दि.२२.०६.२०१७ या कालावधीत तपासणी केली असता ४८७८.४६ क्विंटल एवढया धान्याचा अपहार झाला असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहे. Economic Cost दरानुसार सदर धान्याची रु.१,३२,९६,०६१/- एवढी किंमत आहे.

(२) कळंब तालुक्यातील शासकीय धान्य गोदामातील घोटाळयाची ई.डी किंवा आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सखोल चौकशी करण्याच्या मागणीच्या संदर्भातील निवेदन प्राप्त झाले आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी दि. ६.६.२०१७ रोजी गु.र.नं.१४८/२०१७ व दि.६.७.२०१७ रोजी गु.र.न.१७१/२०१७ प्रमाणे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गु.र.नं.१४८/२०१७ मध्ये ४ आरोपींना अटक केली असून, सदर गुन्हयाचा तपास सूरू आहे. गु.र.नं.१७१/२०१७ मध्ये ६ आरोपींविरूध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले असून त्याचा कोर्ट केस क्र. आर.सी.सी. १६७/२०१७ दि.११.१०.२०१७ असा आहे. तसेच सदर प्रकरणी श्री.अभिजित खराटे, गोदामपाल, शासकीय धान्य गोदाम, कळंब व श्री.टिप्परसे एस.एस, नायब तहसिलदार, कळंब यांना निलंबित करण्यात आले आहे. उपरोक्त निलंबित अधिकारी/कर्मचारी सहीत श्री.अशोक नांदलगावकर, तहसिलदार, कळंब व श्री.डी.एम. मोरे, अ.का.,पुरवठा यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

-----------------

## शिवाजीनगर (जि.पुणे) येथील धान्य गोदामात धान्याचा झालेला गैरव्यवहार

**(५३) * ९५३६५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (जि.पुणे) येथील धान्य गोदामाची अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या तपासणी पथकाने तपासणी केली असता जवळपास ५० लाख रुपयांच्या धान्याचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई येथील तपासणी पथकाने दि.१०.०३.२०११ ते दि.१९.०३.२०११ या कालावधीत शिवाजीनगर, पुणे शहर गोदामाची फेर तपासणी केली. सदर तपासणीत गहू २९५४ पोती कमी आढळून आला. सदर कमी आढळून आलेल्या धान्यसाठयाची एकूण रक्कम रु.९,८९,५९०/- असून सदर वसुलीच्या संदर्भात कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) येथील इंजिनिअरींग महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाबाबत

**(५४) * ९५४२० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील यादवराव तासगावकर इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरींग टेक्नॉलॉजी आणि इंजिनिअरींग मॅनेजमेंट या दोन महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना गत १५ महिन्यांपासून वेतन मिळालेले नसणे, त्यांचा प्रॉव्हिडंट फंड भरलेला नसणे, त्यांना गत पाच वर्षांपासून आयकर रिटर्न भरण्यासाठी फॉर्म-१६ न देणे इ.बाबतच्या तक्रारी सिटीझन फोरम या संस्थेने उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व मुंबई विद्यापीठ प्रशासनाकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या स्तरावरून चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यामध्ये शिधावाटपाच्या धान्याचा होत असलेला गैरव्यवहार

**(५५) * १०२२०६ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील पुरवठा विभागाचे काही अधिकारी व काही दुकानदार यांच्या संगनमताने होत असलेल्या शिधावाटप करावयाच्या धान्याचा काळाबाजार होत असल्याची चौकशी करण्याची मागणी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तहसिलदार यांच्याकडे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) श्री. सागर अनंत उतेकर यांनी दि.३.११.२०१७ रोजी तहसिलदार अंबरनाथ यांना अंबरनाथ पुरवठा विभागातील लाभार्थी पात्र नसताना धान्याचे वितरण होत असल्याची तक्रार केली. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने पुरवठा निरिक्षक अंबरनाथ यांनी ग्रामीण भागातील ३१ रास्त भाव दुकानांपैकी ०६ रास्त भाव दुकानांना अचानक भेटी देऊन सखोल तपासणी केली असून सदर तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. तसेच उक्त तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व रास्त भाव धान्य दुकानदारांना त्यांच्या दुकानात धान्याचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांची यादीचे आगामी ग्रामसभेत वाचन करुन अपात्र लाभार्थ्यांचा लाभ बंद करण्यासाठी यादी सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

रास्तभाव दुकानातून वितरीत होणारे धान्य PoS मशीनद्वारे आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रीक ओळख पटवून देण्याबाबत शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील मिठी नदीच्या वाढत्या प्रदूषणाबाबत

**(५६) * ९५१९९ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदीला पश्चिम उपनगरात सहा मोठे नाले येऊन मिळत असून या नाल्यांलगत असणारी वस्ती आणि औद्योगिक कंपन्यांमधून परवानगीशिवाय सोडण्यात येणाऱ्या प्रकिया न केलेल्या रसायनयुक्त सांडपाण्यामुळे व जैविक कचऱ्यामुळे नदीचे पात्र प्रदुषित होत असल्याचा दावा वॉचडॉग फाऊंडेशनने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठी नदीचे वाढते प्रदूषण रोखण्याकरिता मिठी नदी विकास प्राधिकरण व प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून होत असलेल्या उपाययोजनात्मक बाबी अयशस्वी ठरल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये मिठी नदी व वर्सोवा किनाऱ्यावरील पाणी सर्वाधिक प्रदुषित असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईला प्रत्येक दिवशी २४०० लाख लिटर सांडपाणी निर्माण होते त्यातील केवळ १५०० एमएलटी पाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता असून मुंबईत फक्त ७ ठिकाणी अशाप्रकारे प्रक्रिया केली जाते व खाजगी केंद्रातून ९०० एमएलटी पाण्यावर प्रक्रिया केली जाते आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदर दोषी कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच मिठी नदीला प्रदुषणमुक्त करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मिठी नदीच्या पाण्याची गुणवत्ता ही विहीत मानकांच्या मर्यादेपेक्षा काही प्रमाणात आढळून आली आहे. तसेच वर्सोवा किना-यावरील पाण्यामध्ये फिकल कॉलीफ्रॉमचे प्रमाण विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळून आलेले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक ७/९/२०१७ रोजी कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. त्या संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ७ ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविण्याचे काम नियोजित आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मिठी नदी लगत असलेल्या ८३८ उद्योगांना उत्पादन बंद करण्याच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिंगवेतुकाई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) गावातील विहिरी दूषित झाल्याबाबत

**(५७) * ९८२३१ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या पारस फूड या कंपनीचे दूषित पाणी शिंगवेतुकाई गावातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत असलेल्या विहिरीजवळ सोडण्यात येत असल्याची तक्रार येथील ग्रामपंचायतीने वारंवार औद्योगिक वसाहतीच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही. तथापि, सदर उद्योगाबाबत मा.मंत्री (उदयोग) यांच्याकडे दिनांक २२.११.२०१७ रोजी झालेल्या बैठकीदरम्यान सदर उद्योगामुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असल्याची बाब उपस्थित करण्यात आली होती.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने,दिनांक ९.१०.२०१७ व दि ६.१२.२०१७ रोजी सदर उद्योगाच्या केलेल्या पाहणीदरम्यान उद्योगाने त्याच्या परिसरात पक्के कुंपन लावलेले असून यामधून कोणत्याही प्रकारचा पाण्याचा निचरा होत

असल्याचे आढळून आले नाही. तसेच आजुबाजूच्या परिसरातील विहीरीचे व तळयातील पाण्याच्या नमुन्याच्या पृथकरणावरून सदर पाणी शेती व पिकांच्या वापराकरिताच्या मानंकानाच्या मर्यादेत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरूस्तीकरीता निधीची तरतूद करण्याबाबत

**(५८) * ९५५४८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरूस्तीकरीता एकूण ५ कोटी ६ लाख रुपयांच्या तरतुदींपैकी जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी कोणतीही तरतूद केली नसल्याने तालुक्यातील नळपाणी पुरवठा योजना बंद होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपअभियंता पाणी पुरवठा विभाग, राधानगरी यांचेकडून जिल्हा परिषदेस नळ पाणीपुरवठा देखभाल दुरूस्तीचे १५ प्रस्ताव पाठवून देखील एकही प्रस्ताव मंजूर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील नळ पाणी पुरवठा योजनांची दुरूस्ती करण्याकरीता निधीची तरतूद करण्यासाठी जिल्हा परिषद सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे मागणी करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार निधीची तरतूद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) नाही हे खरे नाही.

राधानगरी तालुक्यातील सन २०१४-२०१५ ते २०१६-२०१७ या तीन वर्षात एकूण २९ नळ पाणी योजनांचे दुरुस्तीचे प्रस्ताव प्राप्त झाले होते, त्यापैकी

निधीच्या उपलब्धतेनुसार १८ नळपाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्तीच्या प्रस्तावांना मंजुरी देवून दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. सदर योजनांच्या दुरुस्तीसाठी रु. ५९.३१ लक्ष खर्च झालेला आहे, तसेच सद्य:स्थितीत या सर्व २९ योजनांमधून पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०१७-२०१८ साठी प्राप्त होणाऱ्या निधीतुन उर्वरीत सर्व प्रस्तावांचा प्राधान्याने विचार करणेत येईल.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्या रसायन मिश्रित पाणी ओढा,नाला व विहिरीत सोडत असल्याबाबत

**(५९) * १००९२२ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील केमिकल झोन असलेल्या औद्योगिक वसाहतीतील रसायन मिश्रित पाणी माहे जून-जुलै २०१७ पासून परिसरातील ओढ्यात, नाल्यात व विहिरीत सोडले जात असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कुरकुंभ, पांढरेवाडी, मळद येथील ग्रामस्थांनी अनेक वेळा औद्योगिक प्रशासनाला निवेदन दिले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील काही कंपन्यांवर अवैधरित्या पाणी सोडल्यामुळे मागील काही दिवसांपूर्वी गुन्हे दाखल करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सोडण्यात येणारे रसायनयुक्त पाणी थांबवण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) कुरकुंभ परिसरात दिनांक ०८ व ०९ ऑक्टोंबर, २०१७ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे औद्योगिक वसाहतीतील पाणी परिसरातील ओढ्या नाल्यामध्ये मिसळल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. रामकमल केमिकल्स, मे. अलकाइल अमाइन, मे रॅन्क्यू रेडीमेड प्रा.लि., मे. हॉनर लॅब, व मे.तारीणी स्टील या प्रकल्पांना दिनांक ११/१०/२०१७ रोजी प्रस्तावित आदेश बजावले आहेत.

तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी प्रक्रियेच्या दिनांक १३/११/२०१७ ते १८/११/२०१७ रोजी केलेल्या पाहणीदरम्यान काही प्रकल्पांनी संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे १६ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस व ५ उद्योगांना प्रस्तावित आदेश बजावण्यात आले आहेत.

सदर घटनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांनी स्थानिक लोकप्रतिनीधींसोबत दिनांक ०९/११/२०१७ रोजी घेतलेल्या बैठकीमधील निर्णयानूसार महाराष्ट्र औद्योगिक वसाहत व सीईटीपी यांनी सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईनची  दुरुस्ती पूर्ण केली असून सद्यस्थितीमध्ये प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा विसर्ग रोटी येथे करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यात मालवाहतूक कंत्राटदारामुळे लाभार्थ्यांपर्यंत रेशन धान्य पोहचले नसल्याबाबत

**(६०) * ९५०९६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात सन २००८ ते २०१६ या कालावधीत सुमारे १०० कोटी रूपयांचे रेशनचे धान्य मालवाहतूक कंत्राटदारामुळे जिल्ह्यातील लाभार्थ्यांपर्यंत पोहचले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी उपायुक्त, पुरवठा विभाग, अमरावती यांना चौकशी अहवाल सादर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित मालवाहतूक कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) तत्कालीन अन्नधान्य वाहतूक कंत्राटदार यांनी दि.१३ मे, २००८ ते दि.३१ मार्च, २०१० या कालावधीत रु.२३,४९,७५,७७८ किंमतीचे अन्नधान्य व दि.०१ एप्रिल, २०१० ते दि.२० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत अंदाजित रु.८३,१७,०६,६५५/- किंमतीचे अन्नधान्य असे एकूण १,०६,६६,८२,४३३/- किंमतीचे अन्नधान्य व्यपगत केल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(२) हे खरे नाही, मात्र, अन्य प्रकरणी शासनाच्या दि.११ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने उप आयुक्त (पुरवठा) यांनी दि.२५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या अहवालान्वये दि.१ एप्रिल, २०१० ते दि.२० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत धान्य व्यपगत झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणली आहे.
(३) दि.१३ मे, २००८ ते दि.३१ मार्च, २०१० या कालावधीतील व्यपगत केलेल्या धान्यासाठी रु.२,३४,९७,५८२/- एवढा दंड संबंधित वाहतूक कंत्राटदारावर आकारण्यात आला आहे, त्यापैकी रु.४४,५४,८५४/- इतक्या रक्कमेची वसुली करण्यात आली आहे. उर्वरित रक्कमेच्या वसुलीसाठी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी महसूल वसूली प्रमाणपत्राच्या कार्यवाहीचे आदेश निर्गमित केले आहेत. याविरुध्द सदर कंत्राटदाराने मा.जिल्हा व सत्र न्यायालय, बुलडाणा येथे अपिल दाखल केलेले आहे. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

दि.१ एप्रिल, २०१० ते दि. २० सप्टेंबर, २०१६ या कालावधीतील व्यपगत केलेल्या अंदाजित रु. ८३,१७,०६,६५५/- इतक्या धान्याचे अंतिम प्रमाणपत्र भारतीय खाद्य निगमकडून अद्याप प्राप्त झालेले नाही. ते प्राप्त झाल्यानंतर संबंधित वाहतूक कंत्राटदाराकडून व्यपगत धान्याच्या किंमतीच्या १० टक्के रक्कम दंड म्हणून वसूल करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# कोल्हापूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा धोकादायक स्थितीत असलेबाबत

**(६१) * १००२३४ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांची दुरावस्था झाली असल्याचे व जिल्हयातील २०० शाळांपैंकी ४५९ वर्ग खोल्या धोकादायक स्थितीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोकादायक स्थितीत असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त धोकादायक स्थितीत असलेल्या ४५९ वर्गखोल्यांपैकी ३२२ वर्ग खोल्यांचे तातडीने बांधकाम करण्याची आवश्यकता असल्याने शिक्षण विभागाकडून २२ कोटी ८२ लाख निधीच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करून वर्गखोल्या दुरूस्तीकरीता १४ कोटी ३९ लाखाची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार वर्ग खोल्यांच्या बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) होय. वर्गखोली बांधकामासाठी रू.२२ कोटी ९६ लाख व शाळा इमारत दुरूस्तीसाठी रू.१४ कोटी ३९ लाख इतक्या रक्कमेची मागणी जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांचेकडे करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे खांडोत्री (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शाळेच्या वर्गखोल्या धोकादायक असल्याबाबत

**(६२) * ९७४९२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खांडोत्री (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील सन १९५५ साली बांधलेल्या पूर्व प्राथमिक मराठी शाळेच्या वर्गखोल्या अत्यंत धोकदायक स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वर्गखोल्यांना लागून दरड असल्याने विदयार्थी व शिक्षकांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेकरिता नवीन वर्गखोल्या बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त शाळेसाठी वर्गखोल्या बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही. धोकादायक वर्गखोल्यांत वर्ग भरत नाहीत.

(३) होय.

(४) शाळेसाठी चार वर्गखोल्या आवश्यक आहेत. सद्य:स्थितीत तीन सुस्थितीत वर्गखोल्या उपलब्ध असून उर्वरित १ वर्गखोली २०१८-१९ च्या जिल्हा वार्षिक योजनेत समाविष्ट करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील गावांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत

**(६३) * ९९०१६ श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील पश्चिम किनारपट्टीवरील वाणगाव, चिंचणी, तारापूर, धाकटी डहाणू, ओसार, ताशी, वाढीवर, मोगरा इत्यादी २५ पेक्षा जास्त गावांना तसेच परिसरातील खेड्यापाड्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी सुमारे रूपये ४५ कोटी खर्च करून शासनाने पाणीपुरवठा योजना राबवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील डहाणू, विक्रमगड, पालघर, तलासरी या चार तालुक्यांकरिता सिंचन आणि पिण्याच्या पाण्यासाठी बांधलेल्या सूची प्रकल्पाचे पाणी डहाणू तालुक्यातील गावांना मिळत नसल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डहाणू तालुक्यातील उपरोक्त गाव व परिसरातील खेड्यापाड्यामध्ये नळांना आठ दिवसातून एकदा पाणी येत असल्याने रहिवाश्यांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त गावांना सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

सदर गावांना बडापोखरण ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमार्फत साखरा धरणातून पाणी पुरवठा होतो.

(३) व (४) बडापोखरण ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या नुतणीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच या योजनेअंतर्गत ३३ उंच टाक्या बांधण्याचे काम सुरु असल्याने उंच टाकीतून पाणी पुरवठा न करता बायपासद्वारे पाणी परवठा करण्यात येतो. त्यामुळे सदर गाव/पाड्यांना कमी दाबाने व अनियमितपणे पाणी पुरवठा होतो. नुतणीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर दररोज व नियमित पाणी पुरवठा सुरु होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवीन पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सेंट जोसेफ हायस्कुलमधील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारहाण केल्याबाबत

**(६४) * १०१३३३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सेंट जोसेफ हायस्कुल मध्ये वाढीव फीच्या वादात विद्यार्थ्यांवर अत्याचार होत असून इयत्ता ५ वीतील सोहम पवार, श्रेयस कावळे व विशाखा सुरवसे या विद्यार्थ्यांना फस्ट टर्मच्या वह्या आणल्या नाहीत या कारणाखाली शिक्षकांनी डस्टर आणि लाकडी पट्टयांनी अमानुषपणे मारहाण केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांच्या या मारहाणीमुळे विद्यार्थ्यांच्या हाताला सूज येऊन एका विद्यार्थ्यांच्या हाताला गंभीररित्या दुखापत झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांच्या पालकांनी अमानुषपणे मारहाण करणाऱ्या शिक्षकांविरोधात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अमानुषपणे मारहाण करणाऱ्या शिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) संबंधित शिक्षिकेस निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ऊस तोडणी मजूरांच्या मुलांसाठी साखर शाळा कार्यान्वित करण्याबाबत

**(६५) * १०२२९३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ऊस तोडणी हंगाम सुरू झाल्याने मोठ्या प्रमाणावर ऊस तोडणी मजूर या परिसरामध्ये दाखल झाला असून त्या मजूरांच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरीता साखर शाळांची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप कोणतीही साखर शाळा कार्यान्वित झाली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानासी जबाबदार असणाऱ्या साखर कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच ऊस तोडणी मजूरांच्या मुलांसाठी साखर शाळा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(६६) * ९५९५३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील १ हजार ४२० गावांमधील पाणी पुरवठा योजनांमध्ये २ हजार कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर योजनांची बुलडाणा जिल्ह्याबाहेरील तांत्रिक समितीमार्फत चौकशी करण्याबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार चौकशीची कार्यवाही सुरु आहे. तसेच योजनानिहाय लेखापरीक्षण करण्याकरता सनदी लेखापालाची नेमणूक करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** — **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** — **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.